


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६४ वे * अंक १८५ * नांदेड * शनिवार, दि. १२ जुलै २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211




## छत्रपती शिवरायांचे १२ किल्ले युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत

**मुंबई (प्रतिनिधी)–** छत्रपती शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या १२ किल्ल्यांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश करण्यात आला आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातील रायगड, प्रतापगड, पन्हाळ्यासह ११ किल्ले आहेत तर तामिळनाडूतील जिंजी या किल्ल्यांचा समावेश आहे.

युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत सध्या भारतातील ४२ वारसा स्थळांचा समावेश आहे. त्यापैकी अजिंठा लेणी, वेरुळची लेणी, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई व्हिक्टोरियन अँड आर्ट डेको एन्सेबल आणि एलिफंटा केव्हज या पाच स्थळांचा या आधीच समावेश होता. त्यामध्ये आता मराठा लष्करी भूप्रदेश म्हणून शिवरायांच्या १२ किल्ल्यांचा समावेश आहे.

रायगड, प्रतापगड, राजगड, पन्हाळ्यासह राज्यातील ११ किल्ले आणि तामिळनाडूतील एक अशा एकूण १२ किल्ल्यांचा समावेश आहे. या किल्ल्यांचा समावेश व्हावा म्हणून गेल्या वर्षी भारत सरकारने युनेस्कोकडे मागणी केली होती.

जागतिक वारसा यादीत समावेश करण्यात आलेले हे सर्व किल्ले सतराव्या शतकात बांधले गेलेले आहेत. हे किल्ले मराठा सैन्याच्या असामान्य लष्करी व्यवस्थेचा आणि अभेद्य तटबंदीचा भक्कम पुरावा आहेत.


















जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# कृत्रिम डीएनए निर्माण : विज्ञानाचा विजय की नैतिकतेचा पराभव?

आजचे युग विज्ञानाच्या अभूतपूर्व प्रगतीचे साक्षीदार ठरत आहे. रोगांवर मात करण्यासाठी, मानवी आयुष्याची गुणवत्ता सुधारण्यासाठी आणि मृत्यूच्या उंबरठ्यावरून माघारी वळवण्यासाठी संशोधक झटत आहेत. मात्र, या वैज्ञानिक उंचीच्या प्रवासात काही टप्पे असे येतात, जेव्हा आपण विचार करायला लागतो. ही प्रगती आहे की, आपत्तीची सुरुवात? त्याचं असं झालं की, ब्रिटनमध्ये सुरू झालेल्या ह्यूमन जीनोम प्रोजेक्टच्या दुसऱ्या टप्प्यात वैज्ञानिकांनी प्रयोगशाळेत पूर्णपणे कृत्रिम मानव डीएनए तयार करण्याचा प्रयोग सुरू केला आहे. हा निर्णय जागतिक स्तरावर चर्चेचा आणि वादाचा विषय ठरला आहे. हे केवळ वैज्ञानिक प्रयोग नाही, तर मानवी जीवनाच्या मूळ संरचनेशी छेडछाड करणारा टोकाचा टप्पा आहे. अशा प्रकारचे प्रयोग यापूर्वी झाले आहेत ज्यामध्ये प्राण्यांचे अवयव मानवी शरीरामध्ये बसवण्याचे अयशस्वी प्रयत्न झाले. त्यावर नंतर बंदी आणण्यात आली. पण हा प्रयोग त्यापेक्षा थोडा वेगळा आहे. डीएनए अर्थात गुणसूत्र म्हणजे जीवनाची मूलभूत योजना. त्याच्या रचनेत आपल्या वंशपरंपरा, गुणधर्म, बुद्धिमत्ता, आजारांची प्रवृत्ती, इतर नैसर्गिक वैशिष्ट्ये गुंतलेली असतात. आजवर आपण नैसर्गिकतेवर अवलंबून राहिलो होतो. पण आता विज्ञान त्या सृष्टीकर्त्याच्या भूमिकेतील प्रवेश करण्याचा प्रयत्न करत आहे. प्रयोगशाळेत डीएनए तयार करणे हे कॉम्प्युटर कोडप्रमाणे अवघड आहे. या कृत्रिम कोडमधील सूक्ष्म चूकसुद्धा गंभीर परिणाम घडवू शकते. पुढील पिढ्यांसाठी जीन थेरपीद्वारे अनुवंशिक आजारांवर उपाय शोधणे, कर्करोगाच्या निदानासाठी डीएनएचा वापर, किंवा शरीराशी सुसंगत अवयव तयार करणे या शक्यता नक्कीच आशादायी आहेत. विशेषतः अंग प्रत्यारोपणासाठी कृत्रिम अवयवांची निर्मिती किंवा आजारांशी लढणाऱ्या पेशींची निर्मिती ही वैद्यकीय क्षेत्रातील क्रांती ठरू शकते. पण याचा उपयोग एवढ्यासाठीच केला जाईल याची कोणती शाश्वती नाही. कारण कोणत्याही तंत्रज्ञानाचा उपयोग कमी आणि दुरुपयोग जास्त झालेला आहे. म्हणूनच विज्ञानातील ही प्रगती जितकी थक्क करणारी आहे, तितकीच धोकादायकही ठरू शकते. कारण येथे प्रश्न केवळ संशोधनाचा नाही, तर मानवतेचा आहे. कृत्रिम डीएनएच्या माध्यमातून जर आपण हवी तशी मुले जन्माला घालण्याची प्रक्रिया सुरू केली, तर समाजात नव्याने भेदभाव उद्भवू शकतो. 'डिझायनर बेबी' ही संकल्पना सामान्य माणसासाठी एक अव्याहत स्वप्न ठरेल आणि केवळ श्रीमंत व सामर्थ्यशाली लोकांसाठी एक नवीन अस्त्र बनेल. अगोदरच काही लोकांनी निर्बुद्ध आणि हिंसक प्रवृत्ती असलेल्या लोकांना जन्म घालण्याचा कारखानाच काढला आहे त्यात आणखीन हा प्रयोग येऊ घातलेला आहे. या प्रयोगात आणखी एक भीतीदायक बाजू म्हणजे जैविक शस्त्रास्त्रांच्या निर्मितीचा धोका. जर मानवी डीएनए कृत्रिमरीत्या बनवता आला, तर त्याच तंत्रज्ञानाचा वापर विनाशकारी उद्दिष्टांसाठी होऊ शकतो. मानवा-सारखे प्राणी निर्माण करणे, मानवी विशेषतेसह नवे जैविक प्रकार तयार करणे यामुळे नैतिकतेच्या सीमा ओलांडल्या जातील आणि जर सृष्टीच्या नैसर्गिक संतुलनाशी हे खेळ सुरू राहिला, तर त्याचे परिणाम अपरिवर्तनीय असतील. माणूस जेव्हा सृष्टीच्या नियमांना अंगठा दाखवतो, तेव्हा तो नव्या संकटांना आमंत्रण देतो. आजवरच्या इतिहासात विज्ञानाच्या अतिरेकामुळे आपण अनेकदा हानीचे दर्शन घेतले आहे ते अणुबॉम्बपासून ते क्लोनिंगपर्यंत. त्यामुळेच, विज्ञाना-तील प्रत्येक प्रगती ही नैतिक निकषांवर पारखली जाणे आवश्यक आहे. केवळ ते करता येते याचा अर्थ ते करावेच लागेल असा होत नाही. हे टाळण्यासाठी मानवाला विज्ञान आणि मानवतेमधील समतोल राखलाच पाहिजे. विज्ञानाचा वापर मानवतेच्या हितासाठीच व्हावा, असा आपला शाश्वत विश्वास असावा. आज आपण ज्या कृत्रिम डीएनए प्रकल्पावर वाद करत आहोत, त्याचा योग्य उपयोग केला गेला, तर तो कोट्यवधी लोकांच्या आरोग्यासाठी वरदान ठरू शकतो. पण त्याचबरोबर या प्रयोगांवर कठोर नियमावली आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर नियंत्रण यंत्रणा आवश्यक आहेत. कारण ब्रिटनमधील डीएनए प्रकल्प हे विज्ञानाच्या शिखराकडे जाण्याचे एक पाऊल आहे, पण ते पाऊल विवेकाने आणि संवेदनशीलतेने टाकले पाहिजे. विज्ञानाने जेव्हा सृष्टीशी सहकार्य केले, तेव्हा जग बदलले. पण जेव्हा त्याने सृष्टीला आव्हान दिले, तेव्हा विनाशही ओढवला. म्हणूनच कृत्रिम डीएनए हे केवळ प्रयोगशाळेतील यश न राहता, मानवतेच्या हितासाठी वापरले गेले पाहिजे. अन्यथा विज्ञानाचा विजय हा नैतिकतेची हार ठरेल आणि शेवटी माणूसच माणसाचा शत्रू बनेल.

# व्यासपीठ : ही तर ज्ञानसूर्याची विवेकवाणी



मानवाला प्रयत्नांती प्राप्त होऊ शकणाऱ्या चौसष्ट कलापैकी वक्तृत्व ही सर्वश्रेष्ठ कला आहे. वाणीवैभव प्राप्त झालेली माणसे या वैभवप्राप्तीने अनेक यशाची शिखरे गाठू शकतात. या वैभवाचा उपयोग सकारात्मक कार्यासाठीच करायचा,हा त्या व्यक्तीचा मनोनिग्रह मात्र खूप महत्वाचा आहे. आपल्या या वैभवाचा उपयोग इतरांची फसवणूक करण्यासाठी केला तर मिळणारे समाधान हे तात्कालीक असेलं. या वैभवाचा उपयोग अनेक मानवी कार्यासाठी करता येतो. त्यामुळे संबधित व्यक्तीच्या जीवनात सर्वार्थाने संपन्नता येते . अनेक समाजोपयोगी व राष्ट्रहिताची कार्य करणे त्यामुळे शक्य होते. आपल्या जवळील प्राप्त ज्ञान रसाळ वाणीने आणि सूत्रबद्ध रितीने गरजवंतापर्यंत पोहचविता आले पाहिजे. मखदुर्बलता असणारी,निरर्थक चर्चा करणारी आणि इतरांची मने दुखावण्यासाठीच जन्माला आलेली माणसे ही खऱ्या अर्थाने दरिद्री असतात. आपल्याला प्राप्त झालेल्या ज्ञानातून आपल्याला असंख्य माणसे जोडता आली पाहिजे. दहा हजार माणसात एक वक्ता असतो आणि दहा हजार वक्त्यात एक उत्तम वक्ता असा असतो जो श्रोत्यांना तृप्त करु शकतो. कर्णतृप्ती झाल्याशिवाय मनशांती मिळत नाही.मन अस्वस्थ करणारे काही वक्ते मनअशांती किंवा समाजात अकारण खळबळ, बैचैनी,अस्वस्थता निमर्ण करण्यातही आघाडीवर असतात. विविध वक्त्यांचे परिश्रम, मेहनत,जिद्द ,चिकाटी व अंतिम उद्देश लक्षात घेऊन अभ्यास केला तर विविध अनुभव आपल्याला अभ्यासण्यासाठी मिळतील. त्यातील काही अनुभव खूप थरारक आहेत. आपल्याला उत्तम बोलता यावं यासाठी किती मेहनत घेण्याची व त्याग करण्याची तयारी त्यांनी ठेवली तेंव्हा कुठे त्यांना वाणीवैभव प्राप्त झाले. हे माईकप्रेमी रिकामचोट,वक्तृत्व क्षेत्राला कलंक असणारे , श्रोत्यांचा जीवघेणा उद्योग करणारे वाचाळवीर,या पवित्र क्षेत्राचे मारेकरी आहेत,त्यांचाच सर्वत्र उत आला आहे. या उथळ पाण्याला असणारा तूफान खळखळाट पाहून कोकणातील नद्याही नतमस्तक होतील.अभ्यासाविना व्यक्त होणारा वक्ता आणि भावनाशून्य राहुन नरकाश्रू ढाळणारा नौटंकी सारखाच. त्यामुळेच वक्तृत्व कला साध्य करण्यासाठी ज्यांनी अपार मेहनत घेतली,अशा काही दिग्गज वक्त्यांचे परिश्रम आपण विचारात घेतले पाहिजेत.

महाभारत निर्माते व्यास यांनी महाभारत हा ग्रंथ अखंडितपणे आपल्या ओघवत्या वाणीत सांगितला आणि तेवढ्याच तत्परतेने गणेशांनी आपली लेखणी चालविली. ते व्यक्त होणे हे व्यासांच्या उत्तम वक्तृत्वाचे उदा. होते,असे सांगितले जाते. ज्या ठिकाणी बसून त्यांनी महाभारत सांगितले. त्या जागेला व्यासपीठ म्हटले जाते. त्यामुळेच ज्या ठिकाणावरुन वक्ता व्यक्त होतो आणि श्रोत्यांचे संपूर्ण समाधान करतो त्या जागेला व्यासपीठ असे म्हणतात. कोणत्याही वाचाळवीराची व्यर्थ बडबड म्हणजे वक्तृत्व नव्हे.त्यामुळे तो व्यक्त होतो. त्याला व्यासपीठ कसे म्हणावे? बरे कोणताही वाचाळवीर बडबडल्यावर त्याला वाचाळपीठ किंवा बकवासपीठ म्हणण्याची प्रथा नाही. तो शब्द तशा प्रकारच्या महान वक्त्यासाठी प्रचलित करायला काही हरकत नसावी. त्यामुळे त्या क्षेत्रातील प्रखर वास्तव बाहेर येण्यास मदत होईल.तात्पर्य वक्ता ज्या जागेवरुन व्यक्त होतो. त्या जागेचे महत्व किती? हे व्यासपीठाच्या महतीवरुन लक्षात यावे. ती जागा प्रज्ञावंताची आहे,ज्ञानसूर्याची आहे असे समजले् जाते. भगवान श्रीकृष्ण हे सर्वोत्कृष्ट वक्ते समजले जातात. त्यांनी कुरुक्षेत्रावर साधलेला संवाद अजरामर झाला. तो एक उत्कृष्ठ वक्तृत्वाचा नमुना होता.आजही अत्यंत दु:खात अडचणीत असणाऱ्या व्यक्तीला भगवद्गीतेतील त्यांनी केलेले भाष्य त्याच्या मदतीला धाऊन येते. श्रीकृष्णांनी आपल्या उत्कृष्ठ वक्तृत्वाने पांडवाना वेळोवेळी जो बोध दिला. त्यामुळे पांडवांचा विजय झाला.

बुद्धाने जगाला दु:खातून मुक्त होण्याचे तत्वज्ञान सांगितले. भरकटलेल्या जीवाला उचित जीवनमार्ग सांगितला. त्यांच्या निष्काम कर्मयोगाची व्याप्ती वाढविण्यास असंख्य अनुयायी समोर आले. तो अखंडित झरा आजही संपला नाही,संपनारही नाही.बुद्ध आणि काश्यप यांचे गुरु शिष्याचे उत्तम उदा. या ठिकाणी नमुद करावसे वाटते. ज्या अत्यंत मागास लोकांच्या प्रबोधनासाठी आपण जाणार आहोत.ते आपल्याला शिव्या देणार असतीलं,मारहाण करणार असतील,जीवे मारणार असतील तरी मला त्यांना ज्ञान देण्यासाठी जावेच लागेल कारण तिथेच माझ्या ज्ञानाची खरी गरज आहे. हा गुरु शिष्याचा सविस्तर संवाद खऱ्या शिष्याची तद्वतच ज्ञानदानाचीआस लागलेल्या खऱ्या गुरुची आणि जीथे मागासलेपण आहे तिथेच खऱ्या अर्थाने गुरुची आवश्यक्ता आहे. गुरुचे आद्य कर्तव्य सुजाण,संस्कारशील समाजालाच अधिकाधिक ज्ञान देणे नव्हे तर ज्ञानदानातही सामाजिक समतोल साधणे हे खरे कर्तव्य आहे. त्यासाठी त्रास,कष्ट,परीश्रम,अपमान,जोखिम सर्व पत्करुन ज्ञानदान करणे हे गुरुचे कर्तव्य आहे. हे सर्व तेंव्हाच शक्य होते.ज्याच्या विचारविश्वातील गुरु किंवा शिक्षकाच्या कर्तव्याच्या संकल्पना स्पष्ट झाल्या आहेत. त्याबरोबरच अशा शिक्षकाचा आपल्या वाणीवैभवावर संपूर्ण विश्वास असतो.समोरची व्यक्ती कितीही मूर्ख ,गुंड किंवा राक्षसी प्रवृत्तीची असेल तरीही माझ्या वक्तृत्व सामर्थ्याने मी त्याच्या जीवनात परिवर्तन घडवून आणेल. ही गुरू भक्ती,त्यातून निर्माण झालेली वक्तृत्व शक्ती, त्या शक्ती संचारातून आलेली कर्तव्य परायणता.हे सर्व व्यासपीठाला भार झालेल्या वाचाळवीरांना कसे शक्य होणार? आमचा फोटो,आमची बातमी, प्रसारमाध्यमातून आम्हीच आम्हाला दिलेली प्रसिद्धी आणि त्याला मिळत नसलेल्या लाईकमुळे निर्माण झालेली अस्वस्थता.या सर्व अवस्थेतून वाणी वैभव वाढणार तरी कसे ?

ग्रिक तत्ववेत्ते सॉक्रेटिस तर कधीही लेखन न करता मानव समुहाशी अहर्निश संवाद साधनारे महान तत्ववेत्ते. त्यांचे सत्य व स्पष्ट विचार तत्कालीन धर्म व राज्य व्यवस्थेला मान्य झाले नाही. त्यांना शिक्षा देतांना माफी किंवा विषप्राशन हे पर्याय ठेवण्यात आले होते.त्यावेळी सत्याची कास धरणाऱ्या या महान तत्ववेत्त्याने,स्पष्ट आणि निर्भिड मत व्यक्त करणाऱ्या वक्त्याने माफी मागून लाचार जीवन जगण्यापेक्षा विषाचा प्याला प्राशन करणे अधिक योग्य समजले. आपल्या विचारावर व शब्दावर ठाम राहुन सत्याचा शोध घेणारा सॉक्रेटिस त्यामुळे विश्वात अजरामर झाला.इ.स.पूर्व ४६६ मध्ये सिसलीतील सिराक्यूझ ग्रीक वसाहतीत लोकशाही शासनप्रणाली अस्तित्वात आली.हद्दपार केलेल्या लोकांनी अत्याचार केलेल्या लोकांवर खटले भरले होते. तेंव्हा त्यांची बाजू मांडण्यासाठी त्यांना एक उत्कृष्ठ वकील व फर्डा वक्ता हवा होता. जो विविध प्रकारचे युक्तीवाद करण्यात कुठेच कमी पडणार नाही. त्यावेळी सिसेलियन ग्रीक कोरॉकने ती जबाबदारी स्विकारली. त्याने वक्तृत्व कलेसाठी एक सूत्रबद्ध पद्धती तयार केली. व्याख्यानात सुसंगत कथन,महत्वपूर्ण टिका, मुद्देसूद सारांश,संक्षिप्त आढावा अशी व्याख्यानाची रचना असावी हे त्याचे मत होते.इ स पूर्व ३८४ ला प्रगटलेल्या डेमोस्थेनीजने जगाला दाखवून दिले की वक्ता हा उपजत नसतो,तर तो अति कष्टाने व स्वंयप्रेणेने तयार होत असतो. त्याचा पारंपारिक व्यवसाय तलवार निर्मिती असल्याने आपले शब्द तलवारीच्या धारेप्रमाणे असावेत. या विचारावर तो ठाम असल्यामुळे आपले उच्चारदोष आणि बारीक आवाजामुळे तो खूप अस्वस्थ व्हायचा. आपल्यातील दोष घालवण्यासाठी माणूस अस्वस्थ झाला की त्यातून मार्ग काढण्यासाठी त्याची साधना सुरु होते. डेमोस्थेनीज या महाजिद्दी वक्त्याने समुद्र किनाऱ्यावर जाऊन लाटांच्या गर्जनास आपले प्रेरणास्थान मानले. त्यांच्या सोबत वक्तृत्व क्षेत्रातला हा रणवीर गर्जना करु लागला. उसळत्या लाटासोबत त्याचा उत्साह उसळू लागला. मनातील निराशा पार समुद्रतळाशी गेली.उच्चारदोष नाहीसे करण्यासाठी आणि बोलतांना दमछाक होऊ नये यासाठी डोंगरावर धावत जाणे, तोंडात लहान गारगोट्या ठेऊन बोलण्याचा सराव सुरु करणे.त्यातून त्याने ध्येयप्राप्ती करुन घेतली.वक्तृत्व घडवावे लागते,हा आदर्श डेमोस्थेनीजने जगासमोर ठेवला.आपल्या शब्दात जीवंतपणा येण्यासाठी मुद्राभिनय,शारीरिक हावभाव महत्वाचे,त्यासाठी नाटकातील नटांची मदत घेतली.अथक् परिश्रम करुनही पहिले व्याख्यान सपशेल पडले, तरी आपल्या मनाला निराशेचा स्पर्श त्याने होऊ दिला नाही. वाणीसामर्थ्याचा अखंड महायज्ञ सुरुच राहिला.आपल्या वक्तृत्वाला शुद्ध चारित्र्याचा परिसस्पर्श दिला आणि वक्तृत्वाला प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली.

आरीसस्टॉटल आपल्या 'रेटारिक' या ग्रंथात नितीपर,करुण रसोत्पादक व तार्किक हे तीन भाव निर्माण करणारे वक्तृत्व असावे असे मत मांडले.त्यांच्या मते नितीचा आधार घेऊन,करुन रसाने ओतप्रोत असलेले,तार्किकतेच्या कसोटीवर सादर केले जाते त्याला व्याख्यान असे म्हणतात. जगजेत्या सिंकदरला वक्तृत्व कलेची शिकवण ज्यांनी दिली. त्या वक्त्याच्या वाणीसामर्थ्याची महती काय,कशी व कोणत्या शब्दात वर्णावी? वक्तृत्वाच्या जोरावर जग जिंकण्याची ईर्षा आपल्या गुरुवाणीमुळे सिकंदरच्या मनात निर्माण झाली. आपल्या पराक्रमी अनुयायांची शृखंला निर्माण करण्यात तो वक्तृत्व कलेमुळे यशस्वी होऊ शकला. मित्रहो शब्दाची ताकद ही अशी अपार आणि अमाप असते. त्याला वजनकाटा किंवा मिटरपट्टा लाऊन मोजने शक्यच नसते. सिसरो हे असेच रोममधील प्रसिद्ध वक्ते होते.'द ओरेटर' नावाच्या आपल्या ग्रंथात ते म्हणतात, वक्ता हा विद्वान, व्यासंगी, भाषाप्रभू आणि श्रोत्याची नाडी ओळखणारा असावा आणि त्याबरोबरच त्यांच्या मर्यादा ओळखणाराही असावा. तो जागृत, दक्ष, संवेदनशील आणि निरीक्षक असावा. त्यामुळे त्याचा प्रभाव निर्माण होतो आणि त्याचे व्याख्यानही प्रभावी होते. त्याने अथेंस व ऱ्होड्स येथील वक्तृत्व विद्यालयातून भाषनकलेचे प्रशिक्षण घेतले. आपल्या वाणीवैभवातून त्याने श्रोत्याच्या मनावर अधिराज्य केले. त्याचा वाढता प्रभाव त्याच्या हितचिंतकांना(?) सहन न होण्यासारखा असल्यामुळे त्याचा प्रभाव संपविने हे आपले अवतारकार्य आहे, असा मनोनिश्चय त्यांनी केला. सिसरो विरोधात कटकारस्थानाची श्रृंखला सुरु झाली. मारेकरी पाठऊन देहाने सिसरो नष्ट करण्यात आले पण त्यांचे विचार कसे संपविणार? भिन्न भिन्न डोक्यातून सिसरो बोलतच राहिला.

इंग्लंडसारख्या लोकशाही देशात तर नामवंत वक्त्याची नामावली फार मोठी होती. अशा प्रतिभासंपन्न वक्त्यांच्या नामावलीत माईकेल फैराडे हे एक नाव. त्यांच्या मते, वक्त्याने आपले पूर्ण कौशल्य पणाला लाऊन श्रोत्यांचे मन व मेंदू आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी आपल्या विचारांचे प्रगटीकरण करावे. श्रोत्यांची शेवटच्या क्षणापर्यंत उत्कंठा वाढावी.ती शिगेला पोहचावी. वक्ता निर्भय,मुक्त,एकाग्र व आपल्या विचारावर ठाम असावा. त्याचे विचार स्पष्ट व ज्ञान निसंदिग्ध असावे. वक्तृत्वाला प्रतिष्ठा प्राप्त होण्यासाठी हे विचार वक्त्यांनी आत्मसात करणे गरजेचे आहे.

जर्मन सैन्यात साधा सैनिक असलेला हिटलर आपल्या वक्तृत्व सामर्थ्यावर जर्मन जनतेचा ह्रदयसम्राट झाला.आवेशपूर्ण भाषनाचा उत्तम नमुना त्याने आपल्या साधनेतून प्राप्त केला होता. वक्तृत्वाने आपला भूतकाळ बदलता येतो. उज्वल भविष्यकाळ आणता येतो. अनेकांची कर्णतृप्ती करुन विचार सकारात्मक दिशेने नेता येतो. मानवी संपत्ती संस्कारशील,विचारक्षम व कार्यक्षम बनविता येते,पण आपल्या विषारी वाणीने सर्व जगात दहशत निर्माण करुन जगाला विनाशाच्या खाईत नेणारा हिटलर एक क्रुरकर्मा म्हणून आपल्या स्मरणात राहतो. हिटलरचे वक्तृत्व जर्मनी बरोबरच संपूर्ण जगाला विनाशाच्या खाईत नेणारे ठरले. हिटलरच्या पावलावर पाऊल ठेऊन बेनिटो मुसोलीनी आपल्या वक्तृत्वाच्या बळावर इटालीचा हुकूमशहा झाला. आपला शब्द प्रमाण मानायला लावणारी कला त्याच्या शब्दात होती. त्याने कार्ल मार्क्स,सोरेल,लुई ग्लानकी या विचारवंताचे साहित्य अभ्यासले. समाजवादी कामगार नेता ते इटालीचा हुकूमशहा हा त्याचा चित्तथरारक प्रवास, त्याचे कार्य हिटलरसारखे,अंतही हिटलर सारखाच. आपल्या देशाला आणि जगाला महायुद्धाच्या खाईत ढकलून हे मानवी जीवनाचे खलपुरुष स्वत: सुखी झाले नाही आणि मानवी जीवनाला सुद्धा सुखी करु शकले नाही. मुसोलीनी आणि त्याची प्रेयसी क्लेरा पेतिस यांना इटालीच्या जनतेने गोळ्या घालून ठार केले आणि त्यांच्या प्रेतांची अवहेलना केली.

माझ्या युवा मित्रांनो या सर्व वक्त्यांच्या कार्य कर्तृत्वावरुन आपल्या वाणीवैभवाचा उपयोग आपण कसा करायचा?याचा निर्णय आपण घ्यायचा आहे.जेंव्हा आपले वक्तृत्व, विचार मानवरुपी राक्षसाचे गुलाम होतात. तेंव्हा मानवी जीवन रसातळाला जाते. आपल्यातील या गुणवैभवाने मनुष्यजीवनाला समृद्ध करणे हाच मनुष्यधर्म आहे. याची जाणीव आपणास व्हावी. आपल्या वक्तृत्वकलेने आपला व्यक्तीमत्व विकास व्हावा, तद्वतच मानवतेचा उद्धार व्हावा.

**-प्रा. वसंत गिरी**
मेहकर, जि. बुलडाणा
मो.९०११२२९२३२

# सुखी जीवनासाठी संयम महत्त्वाचा...

आजच्या धावपळीच्या युगात संयम हे अत्यंत महत्त्वाचे आहे. विविध कामांच्या भारामुळे आणि ताणतणावामुळे मन शांत ठेवणे आणि योग्य निर्णय घेणे कठीण होते.
संयम आपल्याला या सर्व परिस्थितींचा योग्य प्रकारे सामना करायला मदत करतो, लक्ष केंद्रित ठेवतो, आणि सकारात्मक विचारांची जाणीव वाढवतो. त्यामुळे जीवनात संतुलन राखण्यासाठी आणि मानसिक स्वास्थ्यासाठी संयम राखणे अत्यावश्यक आहे. आजच्या धावपळीच्या आणि ताणतणा-वपूर्ण जीवनात, संयम ही एक मौल्यवान कला आहे. ती आपल्याला शांतता, स्पष्टता आणि योग्य निर्णय घेण्याची क्षमता देते. संयम राखल्याने आपण आपली ऊर्जा योग्य ठिकाणी वापरू शकतो, मनःस्थिती स्थिर ठेवू शकतो आणि चांगले संबंध निर्माण करू शकतो. जीवनात संतुलन आणि संयम हीच खरी ताकद आहे.

आज आपण ज्या वेगवान आणि तणावपूर्ण जीवनशैलीत वावरतो, तिथे संयम म्हणजेच शांत आणि विचारपूर्वक निर्णय घेण्याची क्षमता हा एक अमूल्य गुण ठरतो. संयम ठेवला, तर तणावग्रस्त परिस्थितीतही आपण शांतीने विचार करू शकतो. यामुळे गैरसमज, भांडणं आणि मानसिक अस्वस्थता टाळता येते. क्षणिक रागात बोललेल्या शब्दांपेक्षा संयम राखल्यास संवाद अधिक सकारात्मक होतो आणि नाती टिकून राहतात. घाईघाईने घेतलेले निर्णय अनेकदा चुकतात. संयम ठेवल्यास योग्य विचार करून योग्य निर्णय घेता येतो व स्वतःवरचा ताबा वाढतो.

संयम म्हणजे आपल्या भावना, विचार, वागणूक यावर ताबा ठेवणे. जेव्हा आपण संयम बाळगतो तेव्हा आपण तातडीने प्रतिक्रिया देत नाही, तर थोडा विचार करून शांतपणे निर्णय घेतो. त्यामुळे निर्णय अधिक विवेकपूर्ण, परिणामकारक व स्थिर असतो. तसेच संयमाचा सराव करत गेल्यास स्वत:वरचा आत्मनियंत्रण वाढतो, जे यशस्वी व संतुलित आयुष्यासाठी आवश्यक आहे. संयम राखल्याने रस्त्यावर सुरक्षितता वाढते आणि प्रवास अधिक सुखद होतो. वेगाने धावणे, लवकर जाण्याची घाई किंवा इतरांच्या गरजांचा योग्य प्रकारे विचार न करणे यामुळे गैरसोय आणि अपघात होऊ शकतात. त्यामुळे रस्त्यावर सावधगिरीने व संयमाने वागणे हे सर्वांसाठी फायदेशीर आहे. सुरक्षित प्रवासासाठी ही बाब खूप महत्त्वाची आहे.

आजच्या धावपळीच्या युगात वाहन चालकांसाठी संयम अत्यंत महत्त्वाचा आहे. रस्त्यावर सुरक्षितता राखण्यासाठी आणि सर्वांच्या जीविताची काळजी घेण्यासाठी विचार करावा. ट्रॅफिक जाम, रस्त्यावरील अडथळे व इतर वाहनांशी वागताना शांतता राखणे आवश्यक आहे. वेग मर्यादेप्रमाणे आणि नियमांचे पालन करणे, अचानक ब्रेक लावणे टाळणे. ट्रॅफिकमध्ये धावपळ होते तेव्हा राग न येता शांत राहणे. भांडणे टाळण्यासाठी बचाव करण्यासाठी आणि सुरक्षितता राखण्यासाठी नियमांचे काटेकोर पालन करणे. इतर रस्त्यावरील लोकांबद्दल आदर आणि सहकार्य दाखवणे. संयम राखल्यानेच रस्त्यावर सुरक्षितता आणि सुखद प्रवास शक्य होतो.

रस्त्यावर सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी आणि सर्वांच्या जीवनाची रक्षा करण्यासाठी चालकांनी संयम ठेवावा. रस्त्यावर ताणतणाव आणि ताणामुळे चालकांची प्रतिक्रिया वेगळी होऊ शकते. शांतपणे वागणे व संयम राखणे आवश्यक आहे. वेग मर्यादित ठेवणे, लक्ष केंद्रित करणे आणि ट्रॅफिक नियमांचे पालन करणे महत्त्वाचे आहे. रस्त्यावर इतर वाहनधारकांची काळजी घेणे, रस्त्यावरून सुरक्षितपणे जाणे आणि इतरांची अपेक्षा समजणे आवश्यक आहे. ट्रॅफिक जाम किंवा तांत्रिक अडचणी असल्यास धैर्याने थांबणे व अनावश्यक राग न येणे. वाहनचालकांनी आपली जबाबदारी जपावी आणि रस्त्यावर सुरक्षितता व आदराने वागावे. संयम हीच रस्त्यावर सुरक्षिततेची गुरुकिल्ली आहे, जी आपल्याला व इतरांना सुरक्षित ठेवते.

वाहन चालवत असताना पायी चालणाऱ्यांचा विचार करावा. यामुळे रस्त्यांवर सुरक्षितता वाढते आणि अपघात टाळता येतात. आवश्यक वाटल्यास हॉर्न वाजवा किंवा इशारा द्या, जेणेकरून पायी चालकांना तुमची गाडी दिसेल. रस्त्याच्या वेगाच्या मर्यादेपेक्षा जास्त वेगाने न चालणे, कारण त्यामुळे अपघात होण्याची शक्यता वाढते. वर्दळ असलेल्या भागांमध्ये विशेष लक्ष द्या. यामुळे रस्त्यावर सर्वांची सुरक्षितता सुनिश्चित होते. वाहन चालवताना ही बाब लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

**-श्रीकांत मगर**
नांदेड.
मो. ९६८९११७१६९

# घटस्फोटाचे वाढते प्रमाण चिंताजनक



लग्नाच्या गाठी स्वर्गात बांधल्या जातात असे म्हटले जाते. पूर्वी या गाठी घट्ट बांधल्या जायच्या कारण या गाठी आयुष्यभर तुटत नसायच्या. इतकंच काय तर हाच जोडीदार पुढील सात जन्मी मिळो अशी प्रार्थना पतिपत्नी देवाकडे करायचे. हल्ली मात्र या लग्नाच्या गाठी सैल बांधल्या जातात की काय अशी शंका येऊ लागली आहे. कारण आयुष्यभर सोडाच, पण काही वर्षे देखील विवाह झालेले दांपत्य एकत्र नांदायला तयार नाहीत. लग्नानंतर अवघ्या काही वर्षात पतीपत्नीमध्ये वाद होतो आणि हा वाद थेट घटस्फोटापर्यंत पोहचतो.

आज देशातील न्यायालयात घटस्फोटाच्या लाखो याचिका प्रलंबित आहेत. दररोज त्यात भर पडतेच, घटस्फोटाची नवी याचिका दाखल झाली नाही असा एकही दिवस उगवत नाही. घटस्फोटाचे लाखो खटले प्रलंबित असल्याने सहा महिन्यांचा आत घटस्फोटाचा निकाल द्यावा असा निर्णय न्यायालयाने घेतला आहे. घटस्फोटाचे खटले तातडीने निकाली काढले जात असले तरी त्यात नव्याने भर पडत असल्याने न्यायालयही हतबल झाले आहे. वास्तविक दोन दशकांपूर्वी घटस्फोटाचे प्रकरण नगण्य स्वरूपात हो-ते. शेवटचा पर्याय म्हणून घटस्फोटाकडे पाहिले जात होते आज मात्र अगदी किरकोळ कारणांवरून देखील घटस्फोट मागितला जातो.

आज न्यायालयात दाखल होणाऱ्या घटस्फोटाची कारणे पाहिले तर चक्रावून जाल. पत्नीला साडी नेसता येत नाही, पत्नीने केलेला स्वयंपाक बेचव असतो, पत्नी सतत टीव्ही आणि मोबाईलवर असते, पत्नी आपला मान राखत नाही यासारख्या हास्यास्पद आणि मनाला न पटणाऱ्या कारणांनी घटस्फोट मागितला जातो. पत्नीकडूनही घटस्फोटाची अशीच काहीबाही कारणे दिली जातात. पती आपल्याला वेळ देत नाही. पती फक्त त्याच्या आई वडिलांचेच ऐकतो, पती आपल्याला बाहेर फिरायला नेत नाही, पती आपल्या मनासारखं वागत नाही अशी हास्यास्पद कारणे देऊन घटस्फोटाची मागणी केली जाते. घटस्फोटाची ही किरकोळ कारणे जितकी हास्यास्पद वाटतात तितकीच ती चिंताजनक देखील आहेत, कारण अशा किरकोळ कारणांनी जर घटस्फोट होऊ लागला तर विवाह संस्थाच धोक्यात येईल. याशिवाय पती मारहाण करतो, अनैसर्गिक संबंधांची मागणी करतो, पत्नी उलट बोलते, पती म्हणून मान देत नाही अशा कारणांनी देखील घटस्फोटाची मागणी केली जाते अशी आणि यापेक्षाही अनेक वेगवेगळी कारणे घटस्फोटासाठी दिली जातात अर्थात सर्व कारणांचा अभ्यास करूनच न्यायालय घटस्फोटाचा निकाल देते. अर्थात अशा किरकोळ कारणांसाठी घटस्फोटाची मागणी करणे कितपत योग्य आहे याचा विचार दोघांनीही करायला हवे.

नाते कोणतेही असो त्यात राग रुसवा असतोच, संसार म्हटले की भांड्याला भांडे लागतेच, जर दोघ-ात वाद झाला की दोघांपैकी एकाने शांत राहावे थोड्या वेळात राग शांत होतो आणि वादही मिटतो मात्र शब्दला शब्द दिला की वाद वाढतो आणि वादाचे रूपांतर मोठ्या भांडणात होते. त्यात दोन्ही कडील नात्यात कोणीना कोणी तेल ओतणारा असतोच, असे तेल ओतणारे व्यक्ती आल्यास हा वाद थेट न्यायालयात पोहच-तो. अगदी क्षुल्लक कारणही नाते तोडायला पुरेसे ठरत असल्याने नात्याची गुंफण घालताना थोडे सावरूनच वागावे लागते. माझे चुकलेच हे मनाने मान्य करावे लागते. तरच नाते टिकते आणि त्यातही गोडवा राहतो. नात्यात सर्वात महत्वाचा असतो तो विश्वास. जर विश्वासाला तडा गेला तर नात्यात वितुष्ट येतेच म्हणून पतिपत्नी मध्ये विश्वास खूप महत्वाचा आहे विश्वासाला तडा जाऊ न देण्याची जबाबदारी दोघांचीही आहे. नात्यात दुरावा होण्याचे आणखी एक महत्वाचे कारण म्हणजे पती-पत्नीमध्ये असलेला अहंकार. अहंकारा-मुळेच नाती तुटतात, म्हणूनच दोघांनीही अहंकार दूर ठेवायला हवा. अहंकाराला दूर ठेवून परस्परावरील विश्वास कायम ठेवला तर नात्यात दुरावा निर्माण होणार नाही आणि घटस्फोटाचे प्रमाणही कमी होईल.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# मनपाच्या डॉ. शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहाचा उद्या नुतनीकरण लोकार्पण सोहळा

## माजी मुख्यमंत्री तथा खा. चव्हाण यांनी भेट देऊन केली प्रेक्षागृहाची पाहणी

**नांदेड (प्रतिनिधी)**– महानगरपालिकेच्या डॉ. शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहाचे नुतनीकरण, क्षमतावाढ व परिसर विकसित करणे या कामाचा लोकार्पण सोहळा दि. १३ जुलै रोजी दुपारी १२ वाजता पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते होणार आहे. याच पार्श्वभूमीवर शुक्रवार, दि. ११ जुलै रोजी महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खा. अशोक चव्हाण यांनी प्रेक्षागृहास भेट देऊन कामाची पाहणी केली.

नांदेड हे सांस्कृतिक, साहित्यिक व वैचारिक वारसा असणारे शहर असून, नांदेडकरांसाठी आता अत्या–धुनिक सुविधा असलेले प्रेक्षागृह उपलब्ध असणार आहे. या प्रेक्षागृहाच्या कामाची पाहणी करण्यासाठी खा. अशोक चव्हाण यांनी प्रेक्षागृहास भेट दिली. प्रेक्षागृहाच्या कामाची पाहणी करताना कामाचा दर्जा व इतर बाबींची पडताळणी यावेळी त्यांनी केली. त्याच–प्रमाणे प्रेक्षागृहाचे काम अतिशय दर्जेदार झाल्याचे सांगत त्यांनी प्रेक्षागृहात डिजिटल स्क्रीन लावून प्रक्षेपणाची व्यवस्था करण्याची सूचना केली.



याप्रसंगी मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्यासह अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम व महानगरपालिकेचे इतर अधिकारी उपस्थित होते. या प्रेक्षागृहामुळे नांदेडच्या सांस्कृतिक वैभवात भर पडणार असल्याचे मत यावेळी खा. अशोक चव्हाण यांनी व्यक्त केले.

या प्रेक्षागृहाचे नुतनीकरण करताना पूर्वीपेक्षा आसन व्यवस्था वाढविण्यात आली असून, आता एकाचवेळी ८२० श्रोते बसण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच आंतरराष्ट्रीय दर्जाचे साऊंड सिस्टीम उपलब्ध करुन दिलेले असून, संपूर्ण सभागृह हे वातानकुलीत अर्थात ए. सी. असणार आहे. विशेष म्हणजे या प्रेक्षागृहावर सोलार प्लांट बसविला असून, त्यामुळे विद्युत खर्चात बचत होणार आहे. या लोकार्पण सोहळ्यास कलाप्रेमी नागरिकांनी उपस्थिती नोंदवावी, असे आवाहन मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी केले आहे.

# डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय रुग्णालयात हिमालया बेबी फिडिंग सेंटरचा लोकार्पण सोहळा

**नांदेड**–महिला सक्षमी–करण अंतर्गत स्तनपान करणाऱ्या महिलांना हक्काची जागा आणि समानतेची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हिमालय कंपनीच्या सी.एस.आर. निधीतून डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय विष्णुपुरी नांदेड येथे दोन हिमालया बेबी फीडिंग पॉड नुकतेच बसवण्यात आले आहे. यासाठी हिमालया बेबी फिडिंग प्रकल्प समन्वयक असिफ भट यांनी मोलाची मदत केली आहे. वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय मुंबईच्या अधिनस्त राज्यस्तरावर सी. एस. आर. कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे. या कक्षाचे सचिव विजय गायकवाड समाजसेवा अधीक्षक यांच्यामार्फत समाजसेवा अधीक्षक विभागाच्या समन्वयाने नांदेड येथे बेबी फीडिंग पॉड उपलब्ध करून देण्यात आले आहे.




डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय विष्णुपुरी नांदेड येथील बाह्यरुग्ण विभागातील ओ.पी.डी. क्र. ११८ स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र विभाग आणि ओ.पी.डी. क्र. १२७ बालरोग विभाग येथे हिमालया बेबी फीडिंग सेंटर बसविण्यात आले. या बेबी पॅडमध्ये एकाच वेळेस चार स्तनदा माता यांना बाळांना दूध पाजण्यासाठीची व्यवस्था करण्यात आली आहे. यामुळे रुग्णालयात येणाऱ्या स्तनदा मातांना बाळाला स्तनपान करण्यासाठी एक खासगी आणि सुरक्षित जागा उपलब्ध झाली आहे. तसेच मातांना बाळासोबत थोडा वेळ विश्रांती घेता यावी यासाठी आरामदायी जागा ही बेबी पॉड येथे उपलब्ध असणार आहे.

सदर हिमालया बेबी फीडिंग सेंटरचे उद्घाटन अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख यांच्या हस्ते नुकतेच संपन्न झाले. या कार्यक्रमास रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. विजयकुमार कापसे, डॉ. एस. आर. वाकोडे, प्राध्यापक व विभाग प्रमुख, स्त्री रोग व प्रसूतीशास्त्र डॉ. इस्मा–ईल इनामदार, विभाग प्रमुख, जनऔषध वैद्यकशास्त्र विभाग व डॉ. शिवानंद देवसरकर, उपवैद्यकीय अधीक्षक, सर्व समाजसेवा अधीक्षक तसेच परिचर्या संवर्गातील कर्मचारी, रुग्ण व रुग्णनातेवाईक हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समाजसेवा अधीक्षक राजरत्न केळकर यांनी केले. सदर कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता अनिल नागमवाड, संतोष मुंगल, विजय खरात, संजय रत्नपारखी व दिपाली पेटकर या समाजसेवा अधीक्षक यांनी परिश्रम घेतले.




**नांदेड** – गुरूपौर्णिमेनिमित्त नांदेड उत्तरचे आमदार बालाजी कल्याणकर यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन त्यांचे अभीष्टचिंतन केले त्या प्रसंगीचे छायाचित्र.

# सिडकोतर्फे भाडेपट्ट्याने वाटप केलेले निवासी भूखंडांचे कब्जे हक्कामध्ये रुपांतर करता येणार

## सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी समितीची स्थापना

**नवीन नांदेड(प्रतिनिधी)** – सिडकोतर्फे रहिवासी प्रयोजनार्थ भाडे पट्ट्यावर (लिजहोल्ड) वाटप केलेल्या जमिनी कब्जे हक्कामध्ये (फ्रीहोल्ड) रुपांतरीत करण्याबाबत महाराष्ट्र शासनाने निर्णय घेतला आहे. सदर निर्देशा–नुसार प्रामुख्याने निवासी भूखंडांचे फ्रिहोल्डमध्ये रूपांतर करण्यासाठी येणाऱ्या अर्जांची छाननी करण्याकरिता सिडको–तर्फे समिती गठीत करण्यात आली आहे.

ही योजना निविदा प्रक्रियेने, सिडकोमार्फत बांधण्यात आलेले गृहप्रकल्प तथा १२.५%/ व २२.५% योजनेंतर्गत वाटपात करण्यात आलेल्या निवासी भूखंडांकरिता लागू राहील. त्याअनुषंगाने सर्व निवासी मालमत्ता भूधारकांनी अर्ज केल्यावर निश्चित केलेले रुपांतर शुल्क भरल्यानंतर कब्जे हक्कामध्ये रुपांतरीत करता येईल.

ज्या भूखंडाच्या करार–नाम्यामध्ये अनर्जित उत्पन्नाचा भरणा करण्याबाबत उल्लेख आहे, अशा भूखंडांना निश्चित केलेले रुपांतर शुल्कासह विहित अनर्जित रक्कमेचा भरणा करावा लागेल. अनुदानित / सवलतीच्या दराने वाटप केलेल्या भूखंडांचे निश्चित केलेले रुपांतर शुल्काव्यतिरिक्त इतर निश्चित केलेले शुल्क वसूल करून कब्जेहक्कामध्ये रुपांतरीत करण्यात येईल.

सदर योजना ही ऐच्छिक असून, भाडेपट्टाविलेख (लिजडीड) झालेल्या भूखंडांनाच लागू राहील. भूखंडाचे कब्जेहक्कामध्ये रुपांतर झाल्यानंतर मालमत्तेच्या विक्री अथवा हस्तांतरणा–करिता सिडकोतर्फे हस्तांतरण शुल्क आकारले जाणार नाही. कब्जे हक्कामध्ये रुपांतर झालेल्या भूखंडाच्या अधिकार अभिलेखाची नोंद व अद्ययावतीकरण भूमी अभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन यांच्यातर्फे करण्यात येईल. तेव्हा सदर योजनेचा संबंधितांनी पुरेपूर फायदा घ्यावा, असे आवाहन सिडकोच्या वतीने करण्यात आले आहे.

# दुचाकी चोरांकडून नऊ दुचाकी जप्त



**नांदेड (प्रतिनिधी)**– राम–तीर्थ पोलीस ठाण्याच्या हद्दीत तसेच बिलोली तालुक्यात दुचाकी चोरी करणारा आंतरराज्यीय चोरट्यास रामतीर्थ पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्याकडून नऊ दुचाकी व अन्य साहित्य जप्त केले आहे

ऑपरेशन फ्लश आऊट अंतर्गत पोलीस स्टेशन स्तरावर मोहीम राबवून चोरीच्या, विना कागदपत्र मोटार सायकलवर कारवाई करण्याबाबत सर्व पो. स्टे.चे प्रभारी अधिकारी यांना पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी आदेशीत केले होते, दि. १० जुलै रोजी सहायक पोलीस निरीक्षक विक्रम हराळे यांनी आपले सहकारी सपोउपनि भवानगिरकर, हवालदार काळे, अशोक यरपलवाड यांना सोबत घेऊन शोध मोहीम कार्यवाही केली.

यावेळी हणमंत अच्युतराव वडेट्टीवार रा. खतगाव ता. बिलोली याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याच्याकडून चोरीच्या सात लाख रुपयांच्या नऊ दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. रामतीर्थ पोलिसांनी हणमंत अच्युतराव वडेटीवार याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# अन्न व औषध प्रशासनाची भोकरमध्ये कारवाई; एक लाखाचा मुद्देमाल जप्त; दोघांना अटक

**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील अन्न व औषध प्रशासन विभागाच्या पथकाने भोकर शहरात कारवाई करून अवैधरित्या गुटखा विक्री करणाऱ्या दोघांना अटक केली. त्यांच्याकडून जवळपास एक लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे अन्न सुरक्षा अधिकारी अरुण तम्मडवार व त्यांच्या पथकाने बसस्थानकाजवळ येथे (MH 26 CQ 6852) या मोटारसायकलची तपासणी केली असता, वाहनमालक व चालक शेख फईम शेख मनान (वय ३०) हा सदरील मोटारसायकलवरून प्रतिबंधित अन्न पदार्थाची विक्रीसाठी वाहतूक करत असल्याचे आढळून आले. पंचासमक्ष त्याच्या जवळील साठ्याची तपासणी केली असता त्याच्याजवळ राज निवास सुगंधीत पानमसाला, विमल पानमसाला, डायरेक्टर स्पेशल पानमसाला, पानमसाला, मुसाफीर पानमसाला, सितार गुटखा, विविध प्रकारचे सुंगधीत तंबाखू इत्यादी प्रतिबंधित अन्न पदार्थाचा तीस हजार दोनशे बारा रुपये व वाहन (MH 26 CQ 6852) अंदाजे ७५ हजार एकूण १ लाख ५ हजार २१२ रुपये एवढ्या किंमतीचा साठा आढळून आला. सदरचा साठा व वाहन जप्त करून पोलीस स्टेशन भोकर यांचे ताब्यात देण्यात येवून संबंधित हजर व्यक्ती शेख फईम शेख मनान व पुरवठादार शेख रज्जाक शेख हबीब यांच्याविरूद्ध अन्न सुरक्षा अधिकारी अरुण तम्मडवार यांनी अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ चे कलम ५९ व भारतीय न्यायसंहितेचे कलम १२३, २२३, २७४, २७५ व ३(५) नुसार फिर्याद दाखल केली आहे. सदरची कारवाई अन्न सुरक्षा अधिकारी अरुण तम्मडवार यांनी सहकारी अ. भ. भिसे व एच. आर. मरेवार यांचे सहकार्याने व सहायक आयुक्त राम भरकड व संजय चट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली केली.



# जिल्हा परिषदेच्या आवारात बाहेरील लोकांचे बॅनर लावण्यास प्रतिबंध करण्याची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील जिल्हा परिषद आवारात बाहेरील नेते, कार्यकर्ते यांच्या वाढदिवसांचे बॅनर (होर्डिंग्ज) लावले जात आहेत. या प्रकारावर शासन नियमानुसार बंदी असल्याने असे बॅनर लावणाऱ्यावर कारवाई करावी, या मागणीचे निवेदन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) चे जिल्हा उपाध्यक्ष दीपक सातोरे यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिले आहे.

विविध पक्ष व सामाजिक संघटनेचे नेते, कार्यकर्ते हे आपल्या वाढदिवसाचे व इतर कार्यक्रमांचे होर्डिंग जिल्हा परिषदेच्या शासकीय लोखंडी फलकावर लावून लावले जात आहे. शासन जीआरनुसार शासकीय कार्यालयात अधिकारी किंवा कर्मचारी स्वतःचे वैयक्तिक वाढदिवस साजरे करू शकत नाहीत. तर मग शासकीय कार्यालयाच्या बाहेरील उत्साही लोक शासकीय कार्यालयामध्ये येऊन आपले वाढदिवस साजरे करू लागले आहेत. त्यांचे बॅनर त्या ठिकाणी लावत आहेत जिल्हा परिषदेमधील संबंधित अधिकारी याकडे हेतूतः कानाडोळा करीत असून त्यांना कर्तव्याची जाण नसल्याचे दिसून येत आहे.

एवढेच नाही तर ही जागा मुख्य प्रवेशद्वारावर असल्याने या ठिकाणी सर्वसामान्य नागरिकांना माहिती होण्यासाठी शासकीय योजनांचे होर्डिंग लावणे अपेक्षित आहे. मात्र योजनांचे होर्डिंग न लावल्याने या ठिकाणी खासगी व्यक्ती आपले होर्डिंग लावून घेत असल्याचे चित्र दिसत आहे.

# घरफोडी, दुचाकी आणि मोबाईल चोरी करणाऱ्या टोळीतील एकाला अटक; पोनि. चिंचोलकर यांची कारवाई



**नांदेड (प्रतिनिधी)** – शहर आणि परिसरात महागड्या मोबाईलची चोरी, घरफोडी आणि दुचाकी चोरी करणाऱ्या आंतर राज्यीय टोळीतील एकाला नांदेड ग्रामीणचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी अटक केली. त्याच्याकडून किमती २० मोबाईल, दुचाकी आणि सोन्याचे दागिने असा साडेतीन लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. चोरट्याने सहकाऱ्यांसोबत शहरात पाच घरफोडी केल्याची कबुली दिल्याचेही पोलिसांनी सांगितले.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी ऑपरेशन फ्लश आऊट अंतर्गत चोरी व घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणण्याबाबत सर्व पो. स्टे. प्रभारी अधिकारी यांना आदेशित केले होते. त्यानुषंगाने चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी दि. १० जुलै रोजी मिळालेल्या खात्रीशीर गोपनीय माहितीच्या आधारे आरोपी दिवेश मारोती कदम (वय २४ रा. गौतमी नगर, बळीरामपूर, नांदेड) यास ताब्यात घेवून त्याच्याकडे असलेल्या बजाज कंपनीच्या पल्सर २२० दुचाकीबाबत विचारपूस केली.

सदरची दुचाकी चोरीची असल्याचे त्याने सांगितले. त्यावरुन आरोपीकडे आणखी सखोल चौकशी केली असता आरोपीने त्याच्या साथीदारांसह मिळून पो.स्टे. नांदेड ग्रामीण, पो.स्टे. भाग्यनगर, पो.स्टे. शिवाजीनगर, पो.स्टे. विमानतळ हद्दीतील वेगवेगळ्या ठिकाणी चोरी व घरफोडी केल्याचे कबूल केले आहे. तसेच त्याने सांगितले की, त्याने व त्याचे साथीदार संदीप पवार (वय २३ राहणार राजनगर पावडेवाडी नाका), सुरज उर्फ बिच्चू (वय २८ राहणार राजनगर पावडेवाडी नाका) आणि सुनील उर्फ काल्या (वय २७ राजनगर पावडेवाडी नाका) यांनी मिळून नांदेड ते हैद्राबाद जाणाऱ्या–येणाऱ्या ट्रेनमधून, वेगवेगळ्या रेल्वेस्टेशनवरुन तसेच नांदेड शहरातील रेल्वेस्टेशन, बसस्टँड, श्रीनगर, मालेगाव रोड, गोकुळनगर तसेच ग्रामीण हद्दीतील विविध भागातून अनेक मोबाईल चोरले आहेत. आरोपीस विश्वासात घेवुन त्याची घरझडती घेतली असता त्याच्या घरातून २० मोबाईल, सोन्याचे दागिने आणि चोरीची दुचाकी असा ३ लाख ४१ हजार रुपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने तो जप्त करुन ताब्यात घेतला आहे. अटक केलेल्या चोरट्यांनी नांदेड ग्रामीण, शिवाजीनगर, भाग्यनगर आणि विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत घरफोडी केल्याची कबुली दिली असून वरिष्ठांच्या मार्गदर्शना–प्रमाणे पुढील कार्यवाही सुरु आहे.

# गयाबाई घेणेकर यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)** – गयाबाई पांडुरंग घेणेकर वय ७२ वर्षे, रा. गोवर्धनघाट, वजिराबाद यांचे अल्पशा आजाराने दि. ११ जुलै २५ रोजी पहाटे ५ वाजता शहरातील खाजगी रुग्णालयात निधन झाले. त्यांच्या पश्चात दिलीप पांडुरंग घेणेकर, अंगद पांडुरंग घेणेकर ही दोन मुले–सुना, तीन मुली–जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर गोवर्धनघाट स्मशानभूमीत ११ जुलै रोजी सकाळी ११ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. नांदेड वाघाळा शहर मनपाचे वरिष्ठ लिपीक डी. बी. कंठाळे यांच्या त्या सासू होत.



# डॉ. शंकरराव चव्हाण अध्यासन केंद्रातर्फे एकदिवसीय कार्यशाळा; खा. अशोक चव्हाण यांच्या हस्ते उद्घाटन

**नांदेड (प्रतिनिधी)**– महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि दूरदृष्टीचे राजकारणी 'जलशंकर' डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त सोमवार, दि. १४ जुलै रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या डॉ. शंकरराव चव्हाण अध्यासन केंद्रा–तर्फे मराठवाड्यातील सामाजिक, आर्थिक विकास : समस्या व उपाय योजना या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यशाळेचे उद्घाटन महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभेचे विद्यमान खासदार अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते होणार असून, या कार्यशाळेसाठी गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीचे कुलगुरू प्रा. प्रशांत बोकारे यांच्यासह नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, हिंगोलीचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, परभणीचे जिल्हाधिकारी रघुनाथ गावंडे आणि लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे ह्यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर राहणार आहेत. विद्यापीठाचे प्र–कुलगुरू डॉ. अशोक महाजन, विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य यांच्यासह अधिसभा सदस्य आणि विद्यापरिषदेचे सदस्य यांची उपस्थिती असेल. कार्यशाळेसाठी प्रा. डॉ. नरेश बोडखे, गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स, पुणे आणि प्रमोद सडोलीकर, समन्वयक, सायो इम्पिरिकल रिसर्च एलएलपी, पुणे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

मराठवाडा हा महाराष्ट्रातील ऐतिहासिक आणि लोकसंख्येच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण विभाग असून, येथे अद्यापही अल्प दरडोई उत्पन्न, मानव विकास निर्देशांकात कमतरता, पाण्याची टंचाई, शेती व उद्योग क्षेत्रातील मागासलेपणा, बेरोजगारी, शिक्षण व आरोग्य सुविधांची कमतरता या समस्या मोठ्या प्रमाणावर आढळतात. या पार्श्वभूमीवर या कार्यशाळेमध्ये या समस्यांवर सखोल चर्चा व विश्लेषण होणार असून, त्यातून वास्तवाधारित उपाययोजना आणि धोरणात्मक शिफारसींची मांडणी केली जाणार आहे. कार्यशाळेच्या सकाळच्या सत्रात तज्ज्ञांचे मार्गदर्शन असेल तर दुपारच्या सत्रात गटचर्चा व धोरण दस्तऐवजाच्या तयारीसाठी विचारमंथन आयोजित करण्यात आले आहे.

कार्यशाळेमध्ये विद्या–पीठाच्या परिक्षेत्रातील सर्व संलग्नित महाविद्यालयांतील पदवी व पदव्युत्तर स्तरावरील अर्थशास्त्र विषयाचे प्राध्यापक, अभ्यासक व समाजविकास क्षेत्रातील प्रतिनिधींनी सक्रीय सहभाग नोंदवावा, असे आवाहन डॉ. शंकरराव चव्हाण अध्यासन केंद्राच्या समन्वयक डॉ. योगिनी सातारकर आणि विद्यापीठाचे प्र. कुलसचिव डॉ. डी. डी. पवार यांनी केले आहे.

# भाई केशवराव धोंडगे यांची जयंती साजरी



**नवीन नांदेड(प्रतिनिधी)**–श्री शिवाजी प्राथमिक शाळा, वजिराबाद व माणिकनगर, नांदेड येथे शुक्रवार, दि. ११ जुलै रोजी ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी माजी खा. व माजी आ. दिवंगत डॉ. भाई केशवराव धोंडगे यांची १०४ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्या–ध्यापक पंढरीनाथ काळे हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून शहाजी आहेर, शिक्षिका श्रीमती अपर्णा लाडेकर, संगीता वाखरडे यांची उपस्थिती होती. शाळेतील शिक्षक धोंडिबा कोनाले यांनी भाई डॉ. केशवराव धोंडगे यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. बसवेश्वर मंगनाळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले, तर आभार गोविंद पडूळकर यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गजानन शेळगावे, अरुणा स्वामी, एरावती गिरे, अनुजा तेलंग, अविनाश नाईक, लिपीक अंबादास देशमुख, निलेश गायकवाड यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास शाळेतील विद्यार्थी, शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# गुरूपौर्णिमानिमित्त सुरेखा नेरलकर यांचा सन्मान

**नवीन नांदेड(प्रतिनिधी)** – गुरू– पौर्णिमेच्या निमित्ताने सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती सुरेखाताई नेरलकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी माजी नगरसेविका तथा भाजपा महिला मोर्चाच्या प्रदेश सचिव व गुरूदेव दत्त मंदिर भजनी मंडळ यांच्या वतीने ११ जुलै रोजी हा कार्यक्रम घेण्यात आला.



आषाढ महिन्यातील गुरुपौर्णिमा हा गुरुगौरवाचा पवित्र दिवस. या दिवसाचे औचित्य साधून सिडको, नवीन नांदेड येथील गुरुवार बाजार स्थित गुरुदेव दत्त मंदिरात भाजपा प्रदेश कमिटी महिला मोर्चाच्या सचिव प्रा. डॉ. ललिता बोकारे (शिंदे) यांच्या वतीने तसेच गुरूदेव दत्त महिला मंडळाच्या संयुक्त वतीने गुरुपौर्णिमा उत्सव अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी ज्येष्ठ सामाजिक, धार्मिक कार्यकर्त्या सुरेखा अरुणराव नेरलकर यांचा साडी–चोळी, शाल श्रीफळ देवून यथोचित सत्कार करण्यात आला.

मंदिर समितीच्या अध्यक्षा ललिता बोकारे यांनी प्रास्ताविकात भारतीय संस्कृतीतील गुरुचें महत्व विशद केले. सत्कार मूर्ती सुरेखाताई नेरलकर यांनी शालेय बालक, किशोरवयीन मुलांना संस्कारक्षम मूल्य शिक्षण देणे आवश्यक आहे यासंबंधी माहिती दिली.

यावेळी भजन, हरिपाठ, रामरक्षा, हरिपाठ यांचे सामूहिक वाचन करण्यात आले. याप्रसंगी भाजपा मोर्चाच्या महिला पदाधिकारी सर्वस्वी ललिता बोकारे, संतोषी भाले, अनिता गज्जेवार, आशादेवी पताळे, अरुणा बंडेवार, सीमा गुंडाळे, अरुणा करडखेले यांनी हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले. भजनी मंडळाच्या अध्यक्षा मीरा कोत्तावार, मधुबाला पुरी, गुरुमाय, देविका पोलशेटवार, जयश्री गोनाकुडतेवार, संगीता पइतवार, सुरेखा जगदंबे पाटील, मुद्रिका व्यवहारे, लक्ष्मी चाडेवार, सुभद्राबाई, भोसले, सुशीला शिंदे, बेबी कणकापुरे, सुशीलाबाई मठपती यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. उपस्थितांना मिठाई, फळे वाटप व चहापान करून कार्यक्रमाची सांगता झाली.

# तंत्रमंत्र
विज्ञानयुगातील बितंबातम्या



# डिजिटल कन्येचे जाळे

## मॅट्रिमोनियल वेबसाइटवरून लग्न जुळवताना सावधान; सिव्हिल कॉन्ट्रॅक्टरला कोट्यवधी रुपयांचा गंडा

**आजकाल सायबर हल्ल्याच्या घटना वाढत आहेत. दररोज लोकांशी डिजिटल फसवणुकीच्या बातम्या येत आहेत. खरेदी असो किंवा लग्नासाठी वधू किंवा वर शोधणे असो, बहुतेक लोक ऑनलाइन प्लॅटफॉर्मचा अवलंब करतात. अलीकडेच असे एक प्रकरण समोर आले आहे, जे तुम्हाला आश्चर्यचकित करेल. एका डिजिटल मुलीने एका सिव्हिल कॉन्ट्रॅक्टरला लग्नाचे स्वप्न दाखवून कोट्यवधी रुपयांना फसवले. हो, हे प्रकरण हैदराबादमधील एका ३६ वर्षीय पुरुषाचे आहे. मॅट्रिमोनियल वेबसाइटवरून ओळख झालेल्या एका मुलीने त्याला तब्बल १.६ कोटी रुपयांना फसवले.**

गुंडलापोचमपल्ली येथील एका ३६ वर्षीय पुरुषाची फसवणूक झाली. ११ एप्रिल २०२५ रोजी मुलीने वेबसाइटद्वारे त्याच्याशी संपर्क साधला. मुलीने तिचे नाव प्रियंका असे सांगितले. वेबसाइट नंतर, ते व्हॉट्सअॅपद्वारे बोलू लागले. प्रियांकाने सांगितले की ती सिंगापूरमध्ये राहते आणि एका अमेरिकन क्रिप्टो-ट्रेडिंग कंपनीत काम करते. हळूहळू, त्या व्यक्तीचा विश्वास जिंकल्यानंतर, प्रियांकाने त्याला क्रिप्टोकरन्सी ट्रेडिंगमध्ये नशीब आजमावण्यास राजी केले. काही काळानंतर, पुरुषाने प्रियांकाने दिलेल्या लिंकवरून एक अॅप डाउनलोड केले. त्याने १३ एप्रिल २०२५ रोजी पहिली गुंतवणूक केली. पहिला व्यवहार ५०,००० रुपयांचा होता. मुलीने नमूद केलेल्या बँक खात्यात त्याने पैसे ट्रान्सफर केले. पुरुषाचे म्हणणे आहे की पहिल्या ट्रान्सफरनंतर, अॅपने ८,३०० चा त्वरित नफा दाखवला. परताव्याच्या लोभात, त्याने अनेक वेळा पैसे ट्रान्सफर केले आणि UPI पेमेंटद्वारे प्लॅटफॉर्ममध्ये अधिक पैसे गुंतवत राहिला. त्याने १३ एप्रिल ते २४ जून दरम्यान १.६७ कोटी रुपये ट्रान्सफर केले होते. त्याला झालेला नफा वॉलेटमध्ये दाखवत होता. त्याने पैसे काढण्याचा प्रयत्न केला असता चक्क अॅपने वॉलेटच फ्रीज केले. त्यानंतर प्रियांकाने त्याच्याकडून अनलॉक शुल्क म्हणून अतिरिक्त २५ लाख रुपये मागितले. त्याने नकार दिल्यानंतर प्रियांकाचा नंबर बंद दिसू लागला. सोमवारी त्याने सायबराबाद पोलिसांशी संपर्क साधला आणि तक्रार दाखल केली. यानंतर, पोलिसांनी लाभार्थ्यांच्या खात्यांची आणि फसवणूक करणाऱ्यांना ओळखण्यासाठी त्यांनी वापरलेल्या पाच फोन नंबरची माहिती गोळा करण्यास सुरुवात केली आहे.

### अशा प्रकारे सावधगिरी बाळगा



जर तुम्ही विवाह वेबसाइट वापरत असाल तर अनेक गोष्टींची विशेष काळजी घ्या. आजकाल, निष्पाप चेहरा असलेल्या आणि सात प्रतिज्ञा पाळण्याचे आश्वासन देणाऱ्या मुली लाखो लोकांना फसवतात. कोणाशीही बोलण्यापूर्वी, त्यांचे खाते काळजीपूर्वक तपासा. कोणीही पाठवलेल्या लिंकवर क्लिक करू नका. जर ते तुम्हाला कोणतेही अॅप इत्यादी डाउनलोड करण्यास सांगत असतील, तर नेहमी गुगल प्ले स्टोअर किंवा अॅपल अॅप स्टोअर सारख्या प्लॅटफॉर्मवरून अॅप डाउनलोड करा. याशिवाय, तुम्ही त्यांची इन्स्टा, फेसबुक किंवा लिंक्डइन प्रोफाइल देखील तपासू शकता. यामुळे तुम्हाला कळेल की ते खरे आहे की खोटे.

# हा मेसेज पडेल महागात !

## कधीही विश्वास ठेवू नका...

**आजच्या काळात ऑनलाइन घोटाळे सर्रास घडत असतात. घोटाळेबाज दररोज वेगवेगळ्या प्रकारे लोकांना फसवण्याचा प्रयत्न करतात. सहसा घोटाळेबाज सरकारी अधिकारी किंवा पोलीस अधिकारी असल्याचे भासवून लोकांना फोन करतात किंवा ईमेल किंवा एसएमएस पाठवून त्यांना अडकवण्याचा प्रयत्न करतात. अलिकडेच असे काही प्रकार समोर आले आहेत ज्यात घोटाळेबाज लोकांना संदेश पाठवत आहेत ज्यामध्ये पार्सलबद्दल चुकीची माहिती दिली जात आहे. चला तुम्हाला या घोटाळ्याबद्दल सांगूया. तसेच, ते टाळण्याचे मार्ग देखील सांगूया...**

### लोकांना बनावट संदेश

घोटाळेबाज इंडिया पोस्टच्या नावाने लोकांना बनावट संदेश पाठवत आहेत. हे संदेश अगदी खऱ्यासारखे दिसतात परंतु प्रत्यक्षात ते फसवणूक करण्याच्या उद्देशाने पाठवले जातात. चुकीच्या पत्त्यामुळे त्यांचे पार्सल वितरित होऊ शकले नाही, असे संदेशात लिहिलेले असते. संदेशात एक लिंक देखील दिली जाते, ज्यावर क्लिक करून लोकांना त्यांचा पत्ता अपडेट करण्यास सांगितले जाते आणि त्यांना सेवा शुल्क भरण्यास सांगितले जाते. जेणेकरून पार्सल पुन्हा वितरित करता येईल.

### घोटाळा कसा होतो ?

मेसेजमध्ये एक लिंक आहे, ज्यावर क्लिक करून युझर वेगळ्या वेबसाइटवर जातो. ही स्कॅमर्सनी तयार केलेली बनावट वेबसाइट असते. जी युझरची माहिती चोरते. युझरने वेबसाइटवर त्याचे तपशील प्रविष्ट करताच आणि पैसे देताच, स्कॅमर्स त्यांची माहिती चोरू शकतात आणि त्याच्यासोबत मोठी फसवणूक करू शकतात. लोकांना वाटते की मेसेज खरा आहे आणि ते त्यांचे पार्सल पुन्हा डिलिव्हर करण्यासाठी पैसे देतात, परंतु नंतर त्यांची फसवणूक होते. कधीकधी असे मेसेज अशा लोकांनाही पाठवले जातात ज्यांनी काहीही ऑर्डर केलेले नाही. म्हणून, अशा स्कॅमपासून सावध राहण्याची गरज आहे.

### स्कॅम टाळण्यासाठी काय करावे ?

- जर तुम्ही ऑनलाइन काहीही ऑर्डर केले नसेल, तर अशा मेसेजवर विश्वास ठेवू नका.
- जर तुम्हाला असा मेसेज आला तर आधी तुम्ही काही ऑर्डर केले आहे का ते तपासा.
- जर तुम्हाला असा मेसेज आला तर कोणतीही माहिती न घेता मेसेजमध्ये दिलेल्या लिंकवर क्लिक करू नका.
- मेसेजमध्ये दिलेल्या लिंकची तपासणी करा. जर तुम्हाला काही चूक आढळली तर त्यावर क्लिक करू नका.
- पार्सल सेवा पत्ता अपडेट करण्यासाठी किंवा पुन्हा डिलिव्हर करण्यासाठी कधीही पैसे मागत नाही. अशा मेसेजवर विश्वास ठेवू नका.



# नोकरी बदलली पण पीएफचे पैसे विसरलात?

**जर तुम्हाला नवीन नोकरी मिळाल्यानंतरही तुमच्या जुन्या नोकरीतून मिळालेल्या पीएफवर व्याज मिळत राहायचे असेल, तर तुम्हाला तुमचे पीएफ खाते ट्रान्सफर करावे लागेल. हो, नोकरीसोबतच तुम्हाला पीएफ खाते देखील ट्रान्सफर करावे लागेल. यासाठी तुम्हाला काही स्टेप्स फॉलो कराव्या लागतील...**




बहुतेक नोकरदार लोकांकडे ईपीएफ खाते आहे. ईपीएफओ आपल्या सदस्यांना अनेक सुविधा पुरवते. तुम्ही तुमच्या ईपीएफ खात्यातील शिल्लक ऑनलाइन देखील तपासू शकता. तसेच, तुम्ही पैसे काढण्यासाठी अर्ज करू शकता. ईपीएफमध्ये कर सवलतीसोबतच लोकांना चांगले व्याजही मिळते. यामुळे, ते अनेक वर्षे ईपीएफचे पैसे काढत नाहीत, परंतु तुम्हाला माहिती आहे का की जेव्हा तुम्ही नोकरी बदलता तेव्हा ईपीएफ खाते देखील ट्रान्सफर करावे लागते. त्याची संपूर्ण प्रक्रिया आम्ही दिली आहे.

### खाते ट्रान्सफर करावे लागेल

जर तुम्हाला आतापर्यंत हे माहित नसेल, तर आम्ही तुम्हाला सांगतो की जुनी कंपनी बदलल्यानंतर आणि नवीन कंपनीत सामील झाल्यानंतर, तुमचा UAN नंबर तोच राहतो, परंतु खाते हस्तांतरित करणे आवश्यक आहे. जर तुम्ही तुमचे खाते ट्रान्सफर केले नसेल, तर ठराविक वेळेनंतर, तुम्हाला पहिल्या कंपनीच्या ईपीएफ खात्यात जमा केलेल्या पैशांवर व्याज मिळणार नाही. तुमचे खाते हस्तांतरित करण्यासाठी तुम्हाला कुठेही जाण्याची आवश्यकता नाही. तुम्ही तुमचे ईपीएफ खाते घरबसल्या ऑनलाइन ट्रान्सफर करू शकता. नवीन नोकरीत रुजू झाल्यावर ते आपोआप बदलत नाही. एका वृत्तानुसार, खाते आपोआप हस्तांतरित देखील होऊ शकते परंतु हे फक्त तेव्हाच होईल जेव्हा तुमची जुनी कंपनी आणि नवीन खाते दोन्ही EPFO कडे असतील.

### कसे हस्तांतरित करावे ?

- ईपीएफ खाते हस्तांतरित करण्यासाठी, तुम्हाला प्रथम ईपीएफओच्या अधिकृत वेबसाइटला भेट द्यावी लागेल.
- त्यानंतर, होम पेजवर, तुम्हाला डाव्या बाजूला दिलेल्या ऑनलाइन सेवांच्या पर्यायावर क्लिक करावे लागेल.
- आता तुम्हाला FOR EMPLOYEES वर क्लिक करावे लागेल. खाली येताना, One Member – One EPF Account (Transfer Request) या पर्यायावर क्लिक करा.
- नंतर वैयक्तिक आणि पीएफ तपशीलांची पडताळणी करा. यानंतर Get Details वर क्लिक करा.
- आता पडताळणीसाठी तुमची सध्याची किंवा मागील कंपनी निवडा. यासाठी तुम्हाला UAN टाकावे लागेल.
- त्यानंतर Get OTP वर क्लिक करा. तुमच्या नंबरवर एक ओटीपी येईल. ते सबमिट करा.
- यानंतर तुम्हाला एक ट्रॅकिंग आयडी मिळेल. फॉर्म १३ प्रिंट करा.
- यानंतर, त्यावर स्वाक्षरी करा आणि १० दिवसांच्या आत कंपनीला द्या. तुमची मागील कंपनी त्यावर प्रक्रिया करेल आणि मंजूर करेल आणि ते EPFO कडे पाठवेल. त्यानंतर तुम्हाला एसएमएसद्वारे अपडेट मिळेल.

### या वेळेनंतर व्याज मिळणार नाही...

जर नवीन नोकरीत रुजू झाल्यानंतर तुमचे जुने ईपीएफ खाते ट्रान्सफर झाले नाही तर तुम्हाला काही काळासाठी व्याज मिळेल. ईपीएफओच्या नियमांनुसार, जर नवीन कंपनीत सामील झाल्यानंतर ३६ महिने म्हणजेच ३ वर्षांपर्यंत ईपीएफ खात्यात कोणतेही योगदान नसेल, तर ते खाते निष्क्रिय मानले जाते. यानंतर व्याज जुळवणे थांबते.



# फक्त मोबाईल नंबर टाकून कळेल, तुमच्या नावावर किती सिम ?

**जर तुमच्या नावावर अनेक मोबाईल कनेक्शन असतील तर तुम्ही त्यांची यादी सहजपणे पाहू शकता. यासाठी तुम्हाला आधार कार्डची आवश्यकता नाही. तुम्ही फक्त मोबाईल नंबर टाकून ते तपासू शकता. संचार साथी सरकारी पोर्टलवर मोबाईल नंबर टाकून तुमच्या नावावर किती सिम वापरले जातात हे जाणून घेऊ शकतात...**



तुम्हाला तुमच्या नंबरवर वापरल्या जाणाऱ्या सिम कार्ड किंवा मोबाईल नंबरची माहिती असली पाहिजे. बऱ्याच वेळा आम्हाला माहित नसते आणि आमच्या नावावर अनेक नंबर वापरले जात आहेत. जर कोणताही नंबर चुकीच्या कामासाठी वापरला जात असेल तर तुम्ही अडकू शकता. बऱ्याच वेळा असे घडते की आपण आपल्या नावाने मोबाईल नंबर घेतो आणि तो वापरणे बंद करतो किंवा सिम हरवते. अशा परिस्थितीत तो नंबर आपल्या नावावरच राहतो आणि जर सिम चुकीच्या हातात पडला तर तुमच्यासाठी मोठी समस्या निर्माण होते. तथापि, तुमच्या नावावर किती मोबाईल नंबर वापरले जात आहेत हे तुम्ही अगदी सहजपणे जाणून घेऊ शकता. यासाठी तुम्हाला आधार कार्डची आवश्यकता नाही. तुमचा मोबाईल नंबर टाकून तुम्ही तुमच्या नावावर किती मोबाईल नंबर वापरले जात आहेत ते पाहू शकता आणि तेथून ते देखील नोंदवू शकता. कसे ते जाणून घेऊया.

### हे सरकारी पोर्टल काम करेल

संचार साथी (Sanchar Saathi) सरकारी पोर्टल लोकांसाठी खूप उपयुक्त ठरू शकते. या पोर्टलद्वारे, तुम्ही हरवलेला किंवा चोरीला गेलेला फोनदेखील ब्लॉक करू शकता. याशिवाय, तुम्ही भारतीय नंबरवरून येणारे परदेशी कॉलदेखील नोंदवू शकता. तसेच, तुम्ही कोणत्याही फसवणुकीची तक्रार करू शकता. एवढेच नाही तर, हे पोर्टल तुम्हाला अशी सुविधा देखील देते की तुम्ही फक्त तुमचा मोबाइल नंबर टाकून तुमच्या नावावर किती सिम कार्ड वापरले जात आहेत ते पाहू शकता.

### या स्टेप फॉलो करा

- स्टेप १ : जर तुम्हाला तुमच्या नावावर किती सिम कार्ड वापरले जात आहेत हे जाणून घ्यायचे असेल, तर प्रथम संचार साथी पोर्टवर जा.
- स्टेप २ : आता होम पेजवर, तुम्हाला खाली स्क्रोल करावे लागेल.
- स्टेप ३ : नंतर तुम्हाला तुमच्या नावावर मोबाईल कनेक्शन जाणून घ्या हा विभाग दिसेल.
- स्टेप ४ : त्यावर क्लिक करा. आता तुमच्यासमोर एक नवीन विंडो उघडेल.
- स्टेप ५ : यामध्ये तुम्हाला तुमचा मोबाईल नंबर टाकावा लागेल. नंतर कॅप्चा कोड टाकावा लागेल.
- स्टेप ६ : आता OTP बटणावर टॅप करा. यानंतर, तुमच्या मोबाईल नंबरवर OTP येईल.
- स्टेप ७ : हा OTP टाका आणि खाली दिलेल्या लॉगिन बटणावर क्लिक करा.
- स्टेप ८ : हे करताच, तुमच्यासमोर एक स्क्रीन दिसेल, ज्यामध्ये तुमच्या नावावर चालणाऱ्या सर्व मोबाईल कनेक्शनची यादी दिसेल.

### रिपोर्टिंगची पद्धत

तुम्ही वापरत नसलेले कनेक्शन समोरील बॉक्सवर टिक करून निवडा. हे करताच, खाली रिपोर्ट बटण दिसेल. त्यावर क्लिक करून तुम्ही रिपोर्ट करू शकता. तुमच्या माहितीसाठी, आम्ही तुम्हाला सांगतो की त्याचे मोबाइल अॅप देखील उपलब्ध आहे. तुम्ही ते Google Play Store आणि Apple App Store ला भेट देऊन Sanchar Saathi अॅपवरून डाउनलोड करू शकता. अॅपवर अनेक समान वैशिष्ट्ये देखील उपलब्ध आहेत, जी सहजपणे वापरली जाऊ शकतात.



# YouTube चा मोठा निर्णय; १० वर्षे जुने फीचर बंद होणार

**YouTube ने त्यांचे ट्रेंडिंग पेज बंद करण्याचा निर्णय घेतला आहे, जे वर्षानुवर्षे वापरकर्त्यांना लोकप्रिय कंटेंटबद्दल माहिती देत होते. तथापि, YouTube त्याच्या जागी एक नवीन फीचर आणत आहे.**

YouTube च्या या जुन्या फीचरद्वारे, लोकांना ट्रेंडिंगमध्ये काय आहे हे कळत होते. व्हिडीओ निर्माते त्यावर आधारित कंटेंट तयार करतात. ज्यामुळे ते व्हायरल होण्याची शक्यता वाढते. आता व्हिडीओ निर्मात्यांना हा पर्याय उपलब्ध राहणार नाही. तथापि, त्याऐवजी, कंपनी युझर्सना लोकप्रिय सामग्री नवीन पद्धतीने दाखवेल. काही काळापूर्वी कंपनीने घोषणा केली होती की १५ जुलैपासून YouTube च्या कमाई धोरणात बदल होईल. १५ जुलै २०२५ नंतर, फक्त तेच व्हिडीओ निर्माते YouTube द्वारे पैसे कमवू शकतील, ज्यांची सामग्री नवीन आणि मूळ आहे.




गेल्या दहा वर्षांपासून, ट्रेंडिंग टॅब YouTube च्या जागतिक वापरकर्त्यांचे लक्ष वेधून घेत आहे. जर तुम्हाला माहिती नसेल, तर आम्ही तुम्हाला सांगतो की या टॅब अंतर्गत, YouTube ते व्हिडिओ हायलाइट करत असे, जे लोकांमध्ये लवकर लोकप्रिय होत होते. या टॅबमध्ये बहुतेक व्हायरल सेन्सेशन्स, न्यूज हायलाइट्स, म्युझिक रिलीज आणि गुगलच्या व्हिडिओ प्लॅटफॉर्मशी संबंधित अनेक व्हिडिओ होते. १५ जुलैपासून धोरण बदल जाहीर केल्यानंतर, आता YouTube चा ट्रेंडिंग टॅब बंद झाल्यावर YouTube वापरकर्ते आणि निर्मात्यांसाठी पैसे कमवणे अधिक कठीण होऊ शकते, कारण या टॅबद्वारे ते पाहू शकतात की लोक कोणत्या आणि कोणत्या प्रकारचा कंटेंट अधिक पाहण्यास आवडतात. यानंतर, ते त्यावर आधारित कंटेंट तयार करू शकत होते. यासह, त्यांची कंटेंट जलद आणि सहजपणे व्हायरल होण्याची अपेक्षा होती. आता व्हिडीओ निर्मात्यांकडे हा पर्याय राहणार नाही.

# ‘फ्रीज’ केलेल्या बँक खात्यांना पोलीस प्रमाणपत्रावर बँकांनी खुले करावे- मुख्यमंत्री



**मुंबई (प्रतिनिधी)** –सायबर गुन्हे नियंत्रणात आणण्यासाठी महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे. या प्रकल्पांतर्गत सर्वोकृष्टता केंद्र असून या माध्यमातून सायबर गुन्ह्यात फसवणूक झालेल्या नागरिकांची रक्कम तातडीने परत करण्यात येत आहे. सायबर गुन्ह्यात बँकांनी ’फ्रीज’ केलेल्या बँक खात्यातून फसवणुक झालेली रक्कम संबंधिताना लवकर मिळण्यासाठी बँकांनी पोलिस प्रमाणपत्रावर बँक खाते खुले करावे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात सांगितले.

सायबर गुन्हेबाबत सदस्य सिद्धार्थ शिरोळे यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. या सूचनेच्या चर्चेत सदस्य राहुल कूल, अभिजीत पाटील यांनी उपप्रश्न विचारत सहभाग घेतला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, रिझर्व बँकेच्या परिपत्रकानुसार सायबर गुन्ह्यांमध्ये यापुढे बँकांना हात झटकता येणार नाही. बँक सबंधित फसवणुकीच्या गुन्ह्यात रक्कम बँकांना द्यावी लागणार आहे. सायबर फसवणुक लक्षात आल्यास नागरिकांनी तत्काळ तक्रार करावी. यासाठी १९४५ व १९३० हेल्पलाइन क्रमांक जारी करण्यात आले आहे. यावर तक्रार झाल्यास तातडीने फसवणूक होत असलेली रक्कम थांबवता येते. अशी यंत्रणा आहे. सायबर गुन्हेगारीतून फसवणूक टाळण्यासाठी मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्यात येत आहे. सायबर गुन्हेगारीतील रक्कम विदेशातून परत आणण्यासाठी कायद्यात बदल करणे, कायदा अधिक सक्षम करणे, सबंधित देशांशी करार करणे आदीबाबत केंद्र शासनाला विनंती करण्यात येईल.

उत्तरात गृह राज्यमंत्री योगेश कदम म्हणाले, तज्ञछ नेटवर्क वापरून फसवणूक झालेल्या गुन्ह्यात भारतातील तज्ञछ शोधता येते. मात्र विदेशातील तज्ञछ शोधणे अडचणीचे ठरते. पुणे शहरात पाच सायबर पोलिस स्टेशन निर्मितीचा प्रस्ताव आहे. यावर सकारात्मक निर्णय घेण्यात येईल.

कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्प आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून फसवणूक प्रकरणात दोन ते अडीच मिनिटात खाते फ्रीज करून रक्कम थांबविता येते. पुढील ५ वर्षात सायबर बाबत ५ हजार पोलिसांना प्रशिक्षणही देण्यात येत आहे, असेही गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी सांगितले.

# धनगर विद्यार्थी शाळा भ्रष्टाचार दोन शाळांची मान्यता रद्द; अधिकाऱ्यांविरोधात शिस्तभंगाची कारवाई

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** धनगर विद्यार्थ्यांच्या शाळांमधील गैरप्रकरणी कारवाई छत्रपती संभाजीनगर मधील दोन शाळांची मान्यता रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामध्ये गॅलक्सी इंटरनॅशनल स्कूल आणि स्वामी विवेकानंद ग्लोबल स्कूल अँड ज्युनियर कॉलेजची मान्यता रद्द करण्यात आली आहे. राज्याचे ओबीसी मंत्री अतुल सावेंकडून दोषी शाळांची मान्यता रद्द करण्यात आली आहे. तत्कालीन सहाय्यक संचालकांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.

राजे यशवंतराव होळकर इंग्रजी माध्यम निवासी शिक्षण योजनेत मोठा भ्रष्टाचार झाल्याची माहिती उघडकीस आली होती. अनेक संस्थाचालकांनी कागदोपत्री मुले दाखवून सरकारकडून पैसे उचलले होते. केवळ संभाजीनगरच नव्हे तर याची व्याप्ती राज्यभर असल्याचं सांगितलं जात आहे. आता यावर ओबीसी मंत्रालयाने कारवाई केली आहे.

मंत्री अतुल सावे यांनी ओबीसी विभागाच्या प्रादेशिक उपसंचालकांकडून याबाबतीत खुलासा मागवला आहे. तसेच तत्कालीन सहाय्यक संचालकाविरोधात शिस्तभंगाची कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील स्वामी विवेकानंद ग्लोबल स्कूल, आसेगाव या शाळेला १०० विद्यार्थ्यांसाठी मान्यता देण्यात आली आहे. मात्र प्रत्यक्ष भेटीदरम्यान तिथे एकही विद्यार्थी उपस्थित आढळला नाही. वसतिगृह तर अस्तित्वातही नव्हतं. संगणक बंद स्थितीत, खोलीत पूर्ण गोंधळ, आणि संपूर्ण व्यवहार फक्त कागदावरच सुरू असल्याचे दिसून आलं. विशेष म्हणजे, संस्थाचालकाने स्वतःच गेल्या वर्षी या योजनेतून अनुदान मिळाल्याची कबुली दिली.

गॅलेक्सी इंटरनॅशनल स्कूलमध्ये ना विद्यार्थी होते, ना वसतिगृह. तरीही या शाळेने १०० विद्यार्थ्यांसाठी मंजुरी घेऊन सरकारी रक्कम उचललेली आहे.

या प्रकारावरून स्पष्ट होतं की, ही योजना प्रत्यक्षात नव्हे, तर फक्त कागदावर चालवली जात आहे आणि त्याच्या आडून शासकीय निधीची खुलेआम लूट सुरू आहे. हा प्रकार केवळ अनुदान लाटण्यापुरता मर्यादित नसून, तो गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या हक्काशी आणि त्यांच्या भविष्याशी खेळ करणारा आहे.

बीड जिल्ह्यातल्या २० शाळांमध्ये श्रीमंत राजे यशवंतराव होळकर योजनेच्या वसतिगृहास मान्यता आहे. मात्र या योजनेचे निकष केवळ कागदावरच असल्याचे चित्र पाहायला मिळाले. बीड तालुक्यातील तुलसी इंग्लिश स्कूल संत ज्ञानेश्वर नगर, सिद्धिविनायक इंग्लिश स्कूल लिंबागणेश आणि गोरे इंग्लिश स्कूल चौसाळा या शाळांमध्ये हा प्रकार सुरू होता.

यातील तुलसी इंग्लिश स्कूल संत ज्ञानेश्वर नगर ही शाळा आणि याचे वसतिगृह बीड शहरात असल्याने ४०० विद्यार्थ्यांची मान्यता या वसतिगृहाला आहे. परंतु प्रत्यक्षात १२५ ते दीडशे विद्यार्थी इथे दिसून आले. दरम्यान छत्रपती संभाजीनगर येथील बोगसगिरीचा प्रकार समोर आल्यानंतर, बीडमधील संस्थाचालक सध्या अलर्टवर आहेत.

## आश्रम शाळेतील १३ विध्यार्थीनींना विषबाधा, ५ विद्यार्थीनी गंभीर

**बीड (प्रतिनिधी)** बुलढाणा (ईीश्रवहरपर) तालुक्यातील येळगावं येथील पैंनगंगा आदिवासी आश्रम शाळेतील (झरळपसरपसर वर्ळीरीळ ेहीरा डहरश्र) १३ विध्यार्थीनींना विषबाधा झाल्याची घटना घडली आहे. यामध्ये पाच विध्यार्थीनी गंभीर असल्याची माहिती मिळत आहे. रात्रीच्या जेवणातील कढी भात खाल्यानंतर विद्यार्थिनींना उलट्या आणि जुलाबाचा त्रास झाला. विद्यार्थिनींवर बुलढाणा जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरु आहेत. पैनगंगा आदिवासी आश्रम शाळा ही भाजपा जिल्हाध्यक्ष व माजी आमदार विजयराज शिंदे यांची आहे.

बुलढाणा तालुक्यातील येळगाव येथील पैनगंगा आदिवासी आश्रम शाळेतील १३ विद्यार्थिनींना काल रात्री कडी आणि भात खाल्लयाने विषबाधा झाली. अचानक मुलींना उलट्या व जुलाबाचा त्रास सुरु झाल्याने जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. यातील पाच विद्यार्थिनींची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे. पैनगंगा आदिवासी आश्रम शाळा ही बुलढाण्याचे माजी आमदार व सध्याचे भाजपा जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांची आहे.

रात्रीच्या जेवणातील कढी भात खाल्यानंतर विद्यार्थिनींना उलट्या आणि जुलाबाचा त्रास दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार, रात्रीच्या जेवणातील कढी भात खाल्यानंतर विद्यार्थिनींना उलट्या आणि जुलाबाचा त्रास झाला जाणवू लागला होता. त्यानंतर तात्काळ विद्यार्थिनींना बुलढाणा जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. त्यांच्यावर उपचार सुरु करण्यात आले आहेत. दरम्यान, यामधील पाच विद्यार्थिनींची प्रकृती खालावल्याची माहिती मिळत आहे.

# मुख्याधिकाऱ्यांना ६ लाखांची लाच घेताना पकडले, छत्रपती संभाजीनगर एसीबीची कारवाई

**बीड (प्रतिनिधी)** लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकानं बीड मध्ये मोठी कारवाई केली आहे. बीडमधील माजलगाव नगरपालिकेचे मुख्याधिकारी एसीबीच्या जाळ्यात अडकले आहेत. बीडचे जिल्ह्यातील माजलगाव नगपालिकेचे मुख्यमाधिकारी चंद्रकांत चव्हाण यांना पोलिसांनी ६ लाख रुपयांची लाच घेताना पकडण्यात आल्याची प्राथमिक माहिती आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्याकंडून चव्हाण यांच्या घराची तपासणी करण्यात आली आहे. चंद्रकांत चव्हाण यांच्यावर एसीबीकडून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

मिळालेल्या माहितीनुसार कंत्राटदाराला १२ लाखांची मागणी करण्यात आली होती. त्यापैकी ६ लाख रुपयांची रक्कम स्वीकारताना माजलगाव नगरपालिकेचे मुख्याधिकारी



एसीबीच्या जाळ्यात अडकले आहेत. विशेष बाब म्हणजे छत्रपती संभाजीनगर येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाला ६ लाख रुपयांची लाच स्वीकारताना मुख्याधिकारी चव्हाण सापडले.

छत्रपती संभाजीनगर येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकानं माजलगाव नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्याला ६ लाख रुपयांची लाच घेताना पकडले. छत्रपती संभाजीनगर येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकानं माजलगाव मध्ये कारवाई आहे. माजलगावच्या मुख्याधिकाऱ्यांना लाच घेताना पकडल्यानंतर एसीबीनं आणखी कारवाई केली. एसीबीच्या तपासणी पथकाकडून मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण यांच्या घराची करण्यात आली. मिळालेल्या माहितीनुसार या प्रकरणी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. लाचलुचपत प्रतिबंधक विभागानं थेट मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण यांना ६ लाख रुपयांची लाच स्वीकारताना पकडलं. यानंतर पथकाच्यावतीनं चव्हाण यांच्या घराची तपासणी करण्यात आली. या घटनेची माहिती मिळताच माजलगावमध्ये खळबळ उडाली आहे. ठेकेदाराकडून लाच स्वीकारताना सापडल्यानं मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण अडचणीत आले आहेत. माजलगाव शहर पोलीस स्टेशनला गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया सुरु असल्यानं मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. महाराष्ट्र शासनाच्या नगर उत्थान अभियान योजने अंतर्गत, नगरपरिषद माजलगावातील केलेल्या सिमेंट रस्त्याचे कामाचे बिल दोन करोड काढल्याच्या मोबदल्यात ३ टक्के असे ६,००,०००/- रुपये आणि राहिलेल्या उर्वरित कामांमधील रस्त्याचे बाजूचे अतिक्रमण काढून, अडथळे दूर करून देण्यासाठी ६,००,०००/- असे एकूण १२,००,०००/- रुपये लाचेची मागणी चंद्रकांत चव्हाण यांनी केल्याची तक्रार एसीबीकडे करण्यात आली होती. चंद्रकांत चव्हाण यांनी त्यांच्या घरातच पैसे स्वीकारल्यानं अडचणी वाढल्या.

## शेतकऱ्यांनी ठिबक व तुषार सिंचन संचासाठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करावेत

**लातूर (प्रतिनिधी)** अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांचा विकास व्हावा, यासाठी राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत ‘प्रति थेंब अधिक पीक’ योजना सन २०२५-२६ मध्ये राबविली जात आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर ठिबक आणि तुषार सिंचन योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी एस. व्ही. लाडके यांनी केले आहे. अल्प व अत्यल्प भूधारक (२ हेक्टरपर्यंत क्षेत्र) तसेच बहुभूधारक (२ हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्र) असलेल्या अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांसाठी या योजनेअंतर्गत अनुदान उपलब्ध आहे. अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना राष्ट्रीय कृषी विकास योजनेतून ५५ टक्के, मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेतून पूरक अनुदान २५ टक्के आणि बिरसा मुंडा कृषी क्रांती स्वावलंबन योजना अथवा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेतून पूरक अनुदान १० टक्के असे एकूण ९० टक्के अनुदान मिळेल. बहुभूधारक शेतकऱ्यांना राष्ट्रीय कृषी विकास योजनेतून ४५ टक्के, मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेतून पूरक अनुदान ३० टक्के आणि बिरसा मुंडा कृषी क्रांती स्वावलंबन योजना अथवा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेतून पूरक अनुदान १५ टक्के असे एकूण ९० टक्के अनुदान मिळेल. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी https://mahadbt.maharashtra.gov.in/Farmer/agriLogin/सीळडेसळप या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज करावेत.ठिबक आणि तुषार सिंचनामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनात आणि उत्पादकतेत मोठ्या प्रमाणात वाढ होते, तसेच आर्थिक स्तर उंचावण्यास मदत होते. याशिवाय, पाण्याचा काटेकोर वापर होऊन तणांची वाढ रोखण्यासही मदत होते. त्यामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन लाडके यांनी केले आहे.

# आरोग्य विज्ञान विद्यापीठात संगम -२०२५ आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन

**नाशिक (प्रतिनिधी)** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ आणि आय.आय.टी. बॉम्बे यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २२ ते २४ ऑगस्ट २०२५ कालावधीत महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक येथे ’संगम-२०२५’ आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. ’संमम-२०२५’ आंतराष्ट्रीय परिषदेत सहभागी होण्यासाठी विद्यापीठाचे ुर्ीहि.रल.ळप अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने नोंदणी करता असून अंतीम दिनांक ०५ ऑगस्ट २०२५ आहे.

याबाबत विद्यापीठाचे मा.प्रति-कुलगुरु डॉ. मिलिंद निकुंभ यांनी सांगितले की, आरोग्याचे आंतरराष्ट्रीय अर्थकारण, तंत्रज्ञान आणि वृध्दापकालीन आरोग्येवा या विषयावर ’संगम-२०२५’ परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेत विविध देशातील आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञ वेगवेगळया विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत. या परिषदेत प्रि-कॉन्फरन्स घेण्यात येणार असून परिषदेदरम्यान पोस्टर प्रेझेन्टेशन व सायंटिफिक प्रोग्राम यांचा समावेश आहे. विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावरुन नोंदणी करुन जास्तीत जास्त लोकांनी सहभाग घ्यावा असे त्यांनी सांगितले.

याबाबत विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ यांनी सांगितले की, यावर्षी नाशिक येथे आंतरराष्ट्रीय परिषदेच्या निमित्ताने विद्यापीठात आरोग्य क्षेत्रातील सेवा, संशोधन, इनोव्हेशन व इन्कुबेशन संदर्भात उहापोह होणार आहे. संगम-२०२५’ आंतराष्ट्रीय परिषदेत इनोव्हेशन फॉर हेल्थ केअर कम्युनिटी आणि इंटरग्रटींग इकॉनॉमिक्स, इनोव्हेशन ऑण्ड टेक्नोलॉजी ही या परिषदेची थीम असल्याचे त्यांनी सांगितले. संमम-२०२५’ आंतराष्ट्रीय परिषदेत राज्याच्या मा. मुख्यसचिव डॉ. सुजाता सौनिक व आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्ती उपस्थित राहणार आहेत. आय.आय.टी. बॉम्बे येथे गेल्या दोन वर्षापासून ’संगम’चे आयोजन करण्यात येत होते. शासनाचा आरोग्य विभाग, आरोग्य विद्यापीठ व आय.आय.टी. बॉम्बे यांच्या सहकार्यातुन ’संमम-२०२५’ आंतराष्ट्रीय परिषदेत दिशादर्शक ठरणार आहे.

या परिषदेत पेपर प्रेझेंन्टेशन, पोस्टर प्रेझेंटेशन आणि दोन दिशा हॅकेथॉनमधील प्रत्येकी दोन विजेत्यांना बक्षीस प्रदान करण्यात येणार आहेत.

## आपल्या आत असलेल्या ‘गुरू’चा आवाज ऐकावा -प्राचार्य डॉ. बिरादार

**अहमदपूर( प्रतिनिधी)**- माणसाला दोन मनं असतात. बाह्य मन हे त्याला भटकवत असतं. तर अंतर्मन योग्य मार्ग दाखवत असते. अंतर्मन हाच आपला खरा गुरु अ असतो. आपलं भलं व्हावं असं वाटत असेल तर त्याचा आवाज ऐकला पाहिजे, असे प्रतिपादन महाराष्ट्रातील ख्यातनाम लेखक, समीक्षक तथा ज्येष्ठ पत्रकार

प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांनी केले.

येथील महात्मा फुले महाविद्यालयात गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या प्राध्यापकांच्या ’गुरुगौरव’ सोहळ्याच्या अध्यक्षपदावरून ते बोलत होते. यावेळी विचारपिठावर प्रमुख पाहुणे डॉ. बब्रुवान मोरे उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील म्हणाले की, जे सामर्थ्य गुरु जवळ आहे ते देवाजवळही नाही. गुरु मार्ग दाखवत असतो. त्याप्रमाणे चाललं पाहिजे. गुरूंच्या मार्गदर्शनानेच आयुष्याचं सोनं होतं, असंही ते यावेळी म्हणाले. याप्रसंगी मार्गदर्शन करताना पाहुणे डॉ. बब्रुवान मोरे म्हणाले की, भारताला गुरूंची मोठी परंपरा असून, आज जगामध्ये भारताचा नवलौकिक येथील गुरु परंपरेमुळे आहे. आपल्या भाषणातून त्यांनी यावेळी गुरुपौर्णिमेचे महत्त्वही सांगितले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी यांचा विद्यार्थ्यांच्या वतीने महा गुरू गौरव पुरस्कार, सन्मान चिन्ह देऊन प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांचा सत्कार करण्यात आला. तसेच आयक्यूएसी विभागाच्या वतीने महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांना ’गुरु गौरव’ हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

## गणपतीपुळे मंदिरात लवकरच ड्रेसकोड लागू

**रत्नागिरी (प्रतिनिधी)** महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान व प्रसिद्ध तीर्थक्षेत्र रत्नागिरी जिल्ह्यातील गणपतीपुळे येथील स्वयंभू गणपती मंदिरात देवदर्शनासाठी येणाऱ्या भक्त व पर्यटकांना भारतीय हिंदू संस्कृतीला साजेसा पेहराव करून देवदर्शन घेता यावे, याकरिता लवकरच ड्रेसकोड लागू करण्यात येणार असल्याची माहिती देवस्थानचे सरपंच डॉ. श्रीराम केळकर यांनी दिली आहे. तसेच सध्या ड्रेसकोडबाबत भक्त पर्यटकांमध्ये प्रबोधन व्हावे याकरिता मंदिर परिसरात देवस्थान समितीकडून प्रबोधनपर माहिती फलक लावण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.


### Change In Name

My Old Name old name is Pooja Balasaheb Deshmukh - which now I am changing as New Name Pooja Vaibhav Deshmukh Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same.

ADD-:Warapgaon Tq- Kaij, warapgaon ,Beed Maharashtra -431123 Mob no -9309572128

### Change In Name

My Old Name is SATTAR KHAN S/O GULUM MOHAMMAD KHAN which now I am changing as New Name SATTAR KHAN GULUM MOHAMMED KHAN Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same.ADD-:H.N.2-8-144 NAZAR MOHD BULLDING OSMAN SHAHI MILL GATE MO.9420537169

### Change In Name

My Old Name is ABDUL MUQUEET which now I am changing as New Name MOHAMMED ABDUL MUQEET Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same.ADD-:A-1 NURULHA APARTMENT SHVINTHA NAGAR CHENTANYA NAGAR NEAR SANA URDU SCHOOL TARODA BK TARODA BK NANDED MAHARASHTRA 431605 MO.8421004125

### टी.सी हरवली

माझी साक्षी गणेश बेद्रे या नावाची १० वी पास टीसी मुखेड ते नांदेड बस प्रवासात हरवली आहेत तरी कोणाला सापडल्यास आणून द्यावे योग्य ते बक्षीस देण्यात येईल.

-संपर्क पत्ता-
साक्षी गणेश बेद्रे
मु.पो.मुखेड ता.मुखेड
जि.नांदेड
मो.८९९९०५३४२८

### कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

### जाहीर प्रगटन

(भोकर येथील दिवाणी न्यायाधीश क. स्तर, भोकर यांचे न्यायालयात श्री. रवि शिवाजीराव इरले २ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, भोकर दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १५५/२०२५

अर्जदार - १. संजय पि.शंकर दामनवाड वयः २६ वर्षे, धंदा :व्यापारा रा.रायखेडा ता.भोकर जि.नांदेड २.राधाबाई भ्र.संदिप घोणेवाड वय ३५ वर्षे व्यापार- घरकाम रा.माळकौठा ता.जि.नांदेड

विरूध्द

गैरअर्जदार-निरंक

विषय -कलम ३ भारतीय वारसा कायदा- १९२७ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार यांनी या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दिवाणी किरकोळ अर्ज केला आहे की, अर्जदार क्र.१ व २ हे आपसात बहिण भाऊ आहेत. मयत हे अर्जदार क्र.१ व २ यांचे वडील आहेत. अर्जदार क्र.१ हा मयताचा मुलगा असून अर्जदार २ ही मयातची मुलगी आहे. मयत नामे शंकर बळीराम दामनवाड हे दिनांक ६/१२/२०२४ रोजी रायखोड ता.भोकर जि.नांदेड मयत झाले.अर्जदार क्र.१ व २ हेच मयत शंकर बळीराम दामनवाड यांचे कायदेशीर वारस आहेत असे वारसांचे म्हणणे आहे.

मयत नामे शंकर बळीराम दामनवाड यांचे अर्जदार हाच त्यांचे कायदेशीर वारस आहेत.हे वारसा प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाचा उजर अथवा आक्षेप असल्यास त्यांनी स्वतः अगर वकीलामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपले लेखी म्हणणे सादर करावे. अन्यथा त्यानंतर कोणाचाही आक्षेप नाही, असे समजुन अर्जदारातर्फे एकतर्फी निर्णय दिला जाईल. याची नोंद घ्यावी.आज दिनांक ७ जुलै २०२५ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून

क.लिपीक — सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर भोकर

### टी.सी हरवली

माझी साईनाथ संजय सावळे या नावाची १० वी पास टीसी धनज खु ते नांदेड बस प्रवासात हरवली आहेत तरी कोणाला सापडल्यास आणून द्यावे योग्य ते बक्षीस देण्यात येईल.

-संपर्क पत्ता-
साईनाथ संजय सावळे
रा.धनज खु.ता.लोहा जि.नांदेड
मो.८४२१७७०५७५

### टी.सी हरवली

माझी नितेश संजय दासरे या नावाची १२ वी पास कॉमर्स शाखेची टीसी व कागदपत्रे नांदेड ते शिराढोण बस प्रवासात हरवली आहेत तरी कोणाला सापडल्यास आणून द्यावे योग्य ते बक्षीस देण्यात येईल.

-संपर्क पत्ता-
नितेश संजय दासरे
मो.८००७८२२६९९

### टी.सी हरवली

माझी गणेश गंगाराम सोनटक्के या नावाची १२ वी विज्ञान शाखा पासची टीसी राजकार्नर ते वेदांतनगर ऑटो प्रवासात हरवली आहेत तरी कोणाला सापडल्यास आणून द्यावे योग्य ते बक्षीस देण्यात येईल.

-संपर्क पत्ता-
गणेश गंगाराम सोनटक्के
मो.९८९०४४८१६८

### टी.सी हरवली

माझी कंधारे ज्योती पुंडलीकराव या नावाची टी.सी.दिनांक ९/७/२०२५ रोजी सांगवी ते अर्धापुर ऑटो प्रवासात हरवली आहे. तरी कोणाला सापडल्यास आणून द्यावे योग्य ते बक्षीस देण्यात येईल.

-संपर्क पत्ता-
मो.९०११२५९५६५

### टी.सी हरवली

माझी कु. वेदिका तुकाराम कदम या नावाची पंचशील विद्यालय हदगांव येथून काढलेली बारावी पासची टीसी बस प्रवासामध्ये हरवली आहे. कोणाला सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी.

संपर्क पत्ता:-
कु. वेदिका तुकाराम कदम
मु. पो. रुई ता. हदगांव
जि. नांदेड
मो.८४२१७७०५७५

### E - Tender Notice

MAHAVITARAN

The Superintending Engineer, MSEDCL Hingoli Circle Hingoli on behalf of MSEDCL (The Employer) invites sealed e-tenders from reputed and e-registered agencies/ bidders. The details are as given below.

| Sr. No. | Tender No. | Particulars of work | Tender Estimate Cost Rs in Lakhs | Tender Purchasing cost with GST | EMD in Rupees |
|---|---|---|---|---|---|
| 1 | SE/HNG/ET-04 /25-26 | Tender for the work of transportation, loading & unloading of Various material & PSC, RSJ poles, Power transformer from various MSEDCL Stores / Site of Maharashtra to Hingoli & vice versa under Hingoli Circle | Rs.50.00 Lakhs | 5900/- | Rs.50000/- |
| 2 | SE/HNG/ET-05 /25-26 | E-tender for Annual Contract for Monthly Meter Reading through CMRI of LT consumers having Load below 20KW with AMR/MRI Compactible meter under PC-0 under Hingoli Circle | Rs.30.00 Lakhs | 2950/- | Rs.30000/- |
| 3 | SE/HNG/ET-06 /25-26 | Providing services for cleaning & Sanitation of MSEDCL Circle Office Building & Small I.T.Center, 33kV S/S Khakibaba Math,Hingoli Circle, Hingoli S/Dn, Hingoli-R-I,II, U-I & U-II & Sub Division Offices, Kalamnuri, Sengaon, Basmath & Aundha under Hingoli Circle | Rs.10.00 Lakhs | 1180/- | Rs.10000/- |

The tenders will be processed only in electronic tendering mode and opened for registered agencies on e-Tendering system for works contract of MSEDCL. The Bid documents will be available from **12.07.2025 to 18.07.2025 up to 16.00 PM.** The last date of uploading of e-Tendering is **18.07.2025 upto 16.00 PM.** Pre bid meeting will be held on date **14.07.2025 at 11.00 Hrs.** For more details regarding registration process and tender visit our Company's e-Tendering website **https://www.mahadiscom.in.** The undersigned reserves all the rights to accept or reject any or all tenders without assigning any reasons thereof. Contact Details : **S.J.Mungare, Ex.Engr.(Admn) Contact No.: +91 7875460586.**

**Superintending Engineer**
**MSEDCL Hingoli Circle**

**PRO No. 092/2025-26 DT. 11.07.2025**

स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट,पहिला मजला,
शिवाजी नगर,नांदेड

# गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308





दैनिक गोदातीर समाचारचे
मुख्य संपादक

## श्री. केशव घोणसे पाटील (भाई)

यांना वाढदिवसाच्या

## हार्दिक शुभेच्छा



:: शुभेच्छुक ::


आशिष देशपांडे
किनवट


गणपत मुसळे
भोकर


सखाराम क्षीरसागर
अर्धापूर


सन्मूख मठदेवरू
बाऱ्हाळी


प्रविणकुमार दुधारे
हदगाव


शिवाजी पांचाळ
लोहा


सिद्धार्थ तामगाडगे
माहूर


बसवंत मुंडकर
बिलोली


गोविंद नरसीकर
नायगाव


बापूराव रिठ्ठेकर
उमरी


हसनोद्दीन शेख
मुखेड


सिद्धार्थ जाधव
भोकर


ज्ञानेश्वर पंदलवार
हिमायतनगर


गौतम बनसोडे
देगलूर


ज्ञानेश्वर तोडे
शंकरनगर


संतोष चव्हाण
कुंडलवाडी


साहेबराव हौसरे
मुदखेड


ए.एल. सरवरी
कंधार


नंदकिशोर सोनमनकर
तामसा

**तसेच दै. गोदातीर समाचार परिवार, नांदेड**

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४
ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com